दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com

धनत्रयोदिशी पहिला
दिवा लागतो दारी,
कंदिल आणि दिव्यांनी रात्र
उजळते सारी रांगोळी,
फटाके आणि फराळाची तर
मजाच न्यारी चला साजरी करूया!
धनत्रयोदशीच्या सर्व
जनतेस हार्दिक शुभेच्छा !
-संपादक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१७२ | शनिवार, दि.१८ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेले पॅकेज अपुरे ; शेतकरी नाराज-शरद पवार



बारामती । प्रतिनिधी

**अतिवृष्टीने मराठवाड्यात झालेले नुकसान मोठे आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली आर्थिक मदत अपुरी आहे. यामुळे त्यांचे नुकसान भरून निघण्यास मदत होणार नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी म्हटले आहे. ते शुक्रवारी (दि.१७) बारामतीत पत्रकारांशी बोलत होते.**

''आपत्ती येतच राहतात, पण बाधित शेतकऱ्यांना मदत करणे ही सत्तेत बसलेल्यांची जबाबदारी आहे. राज्य सरकारने नुकतीच जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची तीव्रता पाहता, शेतकऱ्यांची भावना आहे की, ही मदत त्यांना त्यांच्या पायावर पुन्हा उभे राहण्यासाठी पुरेसी नाही. यामुळे ते सरकारवर नाराज आहेत, असे पवार यांनी म्हटले. मला यावरुन कसलेही राजकारण करायचे नाही. पण मला खरोखरच असे वाटते की प्रत्येकाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, सरकार शेतकऱ्यांना पुरेशी मदत देत नाही. म्हणूनच आम्ही आजचा दिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे, असे शरद पवार वसुबारसच्या पार्श्वभूमीवर म्हणाले.

## शेतकऱ्यांची दिवाळी काळी - विजय वडेट्टीवार

राज्य सरकारने शेतकऱ्यांना भरघोस मदत करणार सांगत ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली. दिवाळीला सुरुवात झाली तरी प्रत्यक्षात सरकारने मात्र १८०० कोटी पर्यंतच्या मदतीचे जीआर आले आहेत. सरकारने जी मदत दिली आहे, त्यात ही कुठलीही वाढ केलेली नाही. राज्य सरकार केवळ हेक्टरी १० हजार रुपये मदत दिली आहे त्यामुळे ही मदत तुटपुंजी असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दिवाळी ही काळी दिवाळी ठरणार आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. तसेच राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर कालावधीत अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. यांबाबत सरकारने दिवाळीपूर्वी मदत करू असे सांगितले पण जाहीर केलेली मदत तुटपुंजी असल्याची टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली.

# ओबीसीच्या मुळावर जे जे उठले त्यांना आडवे करा-भुजबळ

बीड । प्रतिनिधी

**ओबीसीच्या ताकतीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळं यावर मार्ग काढा ओबीसीत आरक्षण धोक्यात आहे ,आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथं फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाच काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू असे भुजबळ म्हणाले. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा असा इशारा देतानाच विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला अशी टीका भुजबळ यांनी येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलात झालेल्या ओबीसींच्या महाएल्गार मेळाव्यात केली.**




या महाएल्गार मेळाव्यास माजी मंत्री आ धनंजय मुंडे प्रा लक्ष्मण हाके आ गोपीचंद पडळकर माजी आ प्रकाश शेंडगे यांच्यासह ओबीसी समाजातील विविध नेते उपस्थित होते यावेळी बोलताना मंत्री भुजबळ म्हणले कि मराठा समाज आणि आमच्या अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, असे म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली. आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही असे भुजबळ म्हणाले. यावेळी बोलताना भुजबळ यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर देखील टीका केली. विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला अशी टीका भुजबळ यांनी केली. विखे पाटील कारण नसताना जरांगेकडे जातात. भाजपच्या लोकांना मला सांगायचे की तुमच्या लोकांना आवरा असेही भुजबळ म्हणाले. हिशोब ▶▶ पान २ वर



## अंगावर आले तर शिंगावर घ्या-मुंडे

**बीड** : मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण त्यांना वेगळे आरक्षण द्या. आमच्या हक्काचे आरक्षण देणार असाल तर त्याला आम्ही विरोध करणार असे वक्तव्य माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले. यापुढे ओबीसी आरक्षणाला लढा हा देशाचे नेते छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली लढण्यात येणार असे सांगतानाच अंगावर आले तर शिंगावर घ्या, असे आवाहन त्यांनी केले. येणाऱ्या नगरपंचायत, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ओबीसींची ताकद दाखवून द्या, असे आवाहनही त्यांनी केले. बीडमध्ये ओबीसी समाजाचा एल्गार मेळावा पार पडला. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी मनोज जरांगे यांच्यावरही टीका केली.



धनंजय मुंडे पुढे म्हणाले की, एका व्यक्तीने जाती-जातीत ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आतापासूनच बियाणं, खतं, निविष्ठाचं नियोजन-भरणे

पुणे: ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम महत्वाचा आहे. सध्या धरणं, विहिरी तुडुंब भरल्याने शेतकऱ्यांना या वर्षी पाण्याची फारशी टंचाई भासणार नाही. म्हणून यंदा रब्बी पिकाखालचं क्षेत्र ६५ लाख हेक्टर पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर, राज्यातील रब्बी हंगामाचे नियोजन अधिक सक्षम व समन्वित पद्धतीने करून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देण्यासाठी ठोस उपाययोजना आखण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. रब्बी हंगामाची पूर्व तयारी मा.मुख्यमंत्री, देंवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सुरु असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

### सहा नृत्यांगनांचा सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न

कोल्हापूर: कोल्हापूरमध्ये शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर रोजी एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील महिला सुधारगृहामध्ये असलेल्या सहा नृत्यांगनांना सामूहिकरीत्या जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. या सर्व नृत्यांगनांनी आपल्या हाताच्या नसा कापून घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र ही घटना उघडकीस येताच प्रशासनाने धावपळ करून सर्व महिला नृत्यांगनांना तातडीने उपचारांसाठी रुग्णालयात दाखल केले. सध्या महिला सुधारगृहात असलेल्या या सहा नृत्यांगनांना पोलिसांनी दोन महिन्यांपूर्वी केलेल्या कारवाईदरम्यान, ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांची रवानगी महिला सुधारगृहामध्ये करण्यात आली होती. दरम्यान, शुक्रवारी सकाळच्या सुमारास सहा नृत्यांगनांनी आपल्या हाताची नस कापून घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रशासनाने प्रसंगावधान दाखवत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केल्याने त्यांचे प्राण वाचले.

### धनत्रयोदशीच्या तोंडावर सोनं १ लाख ३० हजारांच्या पार


मुंबई: दिवाळीत धनत्रयोदशीला मोठ्या प्रमाणावर भारतीय लोकं सोनं खरेदी करतात. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सोन्या चांदीचे दर वाढत आहेत. दिवाळीपूर्वी सोन्याचा १० ग्रॅमचा दर हा १ लाख ३० हजाराच्या पार पोहचला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या हंगामात सोन्याच्या दरात जवळपास ६५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी धनत्रयोदशीला १० ग्रॅम सोन्याचा दर हा ७८ हजार ६१० रूपये इतका होता. २०२५ च्या पहिल्या दहा महिन्यातच सोन्याच्या दरामध्ये तब्बल ५८ टक्के वाढ झाली आहे. भारतीयांच्या दृष्टीने यंदाच्या दिवाळीत धनत्रयोदशीला चढ्या दरानंच सोने खरेदी करावी लागणार आहे. फक्त वाढणारा सोन्याचा दरच नाही तर त्याच्यावर असलेला ३ टक्के जीएसटी हा देखील भारतीयांसाठी खिसा रिकामा करणारा ठरणार आहे.

# शेतकऱ्यांसाठी उद्धव ठाकरे दिवाळीनंतर मराठवाडा दौऱ्यावर

मुंबई । प्रतिनिधी

**मी ८ दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरात येऊन गेलो. तेथून निघताना मी मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती होईपर्यंत या सरकारला सोडणार नसल्याची ग्वाही दिली होती. दिवाळीनंतर आपण मराठवाडा दौरा करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी सांगितले.**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष व माजी नगरसेवक सोहेल शेख, रवींद्र तांगडे यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री निवासस्थानी ठाकरेसेनेत पक्षप्रवेश केला. यावेळी ते बोलत होते. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारच, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. उद्धव ठाकरे




म्हणाले, सध्या सरकारची निव्वळ फसवाफसवी सुरू आहे. खरडून गेलेल्या जमिनीला त्यांनी हेक्टरी तीन साडेतीन लाख जाहीर केले. सरकारने या साडेतीन लाखांपैकी १ लाख दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

# बीड जिल्ह्यासाठी १०२ कोटी ६३ लाखांचा मदतनिधी मंजूर

बीड । प्रतिनिधी

**सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे . या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला असून राज्यातील पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्ह्यांसाठी तब्बल ₹१३४६ कोटी ३० लाख रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला आहे . या**



**निधीपैकी बीड जिल्ह्यासाठी ₹ १०२ कोटी ६३ लाख रुपये वितरित होणार आहेत.**

शासन निर्णय १६ ऑक्टोबर २०२५ नुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे . अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना 'इनपुट सबसिडी' या स्वरूपात आर्थिक मदत दिली जाणार असून ही मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे. बीड तालुक्यातील नुकसान व मदतवाटपाची तयारी - बीड तालुक्यात एकूण १,२०,८७२ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान नोंदवले गेले आहे . बीड, नेकनूर, पेंडगाव , पारगाव सिरस , मांजरसुंबा , येळंबघाट , चऱ्हाटा , नाळवंडी , म्हाळसजवळा , पाली, लिंबागणेश , चौसाळा , घाटसावळी , राजुरी नवगण , पिंपळनेर आणि कुर्ला या मंडळांतील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई ▶▶ पान २ वर

# नातवाने जंगलात सोडलेल्या आजीने घेतला अखेरचा श्वास

मुंबई । प्रतिनिधी

गोरेगाव आरे कॉलनीच्या जंगलात एका काळोख्या रात्री कॅन्सरग्रस्त आजीला नातवाने निर्जनस्थळी सोडून दिल्याची घटना घडली होती. पोलिसांनी आजीला रुग्णालयात दाखल करीत तिचा जीव वाचवला होता. या आजीने अखेर आश्रमातच अखेरचा श्वास सोडला. यशोदा गायकवाड (वय ६८) असे आजीचे नाव असून तिच्या मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे. २३ जून २०२५ रोजी आरेच्या जंगलात कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ यशोदा ▶▶ पान २ वर

# भूपेंद्र पटेलांच्या मंत्रिमंडळात १९ नवीन चेहरे

गांधीनगर । प्रतिनिधी

भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने गुजरातमध्ये मोठा फेरबदल केला असून मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळातील सर्वच मंत्र्यांचे राजीनामे घेतल्यानंतर १९ नवीन चेहऱ्यांसह २६ जणांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. मंत्रिमंडळ विस्तार करताना भाजपने सामाजिक समीकरणाची विशेष काळजी घेतली असून तीन महिलांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची भाजपने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचे संपूर्ण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१७ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ३८.५० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,६४४ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००० | ५,२१० | ४,६०५ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५५८ |
| मुग: १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: ५०९.५० क्विंटल | २,४५० | ४,१९० | ३,८८४ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,००० | ५,४०० | ४,७६६ |

## मध्यमवर्गीयांना हक्काचे घर मिळणार ; मोदी सरकारची सर्वसामान्यांना दिवाळीची भेट

दिल्ली । वृतसंस्था

**मोदी सरकारने दिवाळीपूर्वी मध्यमवर्गीयांना मोठी भेट दिली आहे. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय)-शहरी २.० या अंतर्गत १.४१ लाख अतिरिक्त घरे बांधण्यास मान्यता दिली आहे. योजनेच्या अंतर्गत सरकार शहरी गरीब आणि मध्यमवर्गीयांना त्यांचे हक्काचे घर मिळवण्यास मदत होईल.**

पीएम आवास योजनेअंतर्गत १.४१ लाख अतिरिक्त घरांच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय मंजूर झालेल्या निवासी युनिट्सची एकूण संख्या १० लाखांपेक्षा जास्त झाली आहे. अतिरिक्त घरांच्या बांधकामासाठी १४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यात आसाम, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, जम्मू-काश्मीर, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, मध्य प्रदेश, मेघालय, हरियाणा, ओडिशा, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश यांचा समावेश आहे. ही योजना शहरी लाभार्थ्यांना घरे प्रदान करण्यास हातभार लावते. याशिवाय गरीब आणि असुरक्षित घटकांना परवडणारी पक्की घरे प्रदान करून जीवनमान सुधारण्यास मदत करते. याव्यतिरिक्त महिला सक्षमीकरणावर देखील लक्ष केंद्रित करते, ▶▶ पान २ वर

# डिजिटल अटक घोटाळ्याची सुप्रीम कोर्टात गंभीर दखल

नवी दिल्ली । वृतसंस्था

**ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून त्यांच्या आयुष्याची कमाई लुटणाऱ्या 'डिजिटल अटक' घोटाळ्यांची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाने या प्रकरणी शुक्रवारी सुओ मोटो (स्वत:हून) याचिका दाखल करून घेत केंद्र सरकार, सीबीआय आणि इतरांना नोटीस बजावली आहे.**

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने या गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महान्यायवादी आर. वेंकटरमणी यांना



न्यायालयाला सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. घोटाळेबाज गुन्हेगार न्यायाधीकरण आणि न्यायालयांच्या अधिकारांचा गैरवापर करत असल्याबद्दल न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील सार्वजनिक विश्वासाच्या मुळावर तसेच कायद्याच्या राज्यावर थेट आघात होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. अंबाला येथील एका ज्येष्ठ नागरिक दाम्पत्याने दाखल केलेल्या तक्रारीवरून न्यायालयाने ही सुओ मोटो याचिका दाखल केली आहे. या दाम्पत्याची ३ सप्टेंबर २०२५ ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत डिजिटल अटक घोटाळ्याद्वारे त्यांच्या आयुष्याची मोठी बचत लुटण्यात आली आहे. खंडपीठाने नमूद केले की, ''बळी पडलेल्या नागरिकांनी सांगितले की त्यांच्याशी सीबीआय अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांचे सोंग घेतलेल्या व्यक्तींनी फोन तसेच व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. या बनावट व्यक्तींनी व्हॉट्सअ‍ॅप आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# वैशिष्ट्येपूर्ण निवडणूक अन् भाकितांचा महापूर

बिहार राज्याची विधानसभा निवडणूक आता अगदी तोंडावर आली आहे. ६ नोव्हेंबरला मतदानाचा प्रथम टप्पा होणार आहे. साहजिकच सर्व राजकीय पक्षांची धावपळ होताना दिसत आहे. आपल्याकडे जवळपास दर सहा महिन्यांनी कोणत्या ना कोणत्या मोठ्या राज्यातील विधानसभा निवडणूक उगवते आणि ती जणूकाही राष्ट्रीय महत्त्वाची निवडणूक असल्याप्रमाणे वातावरण निर्मिती केली जाते. मिडिया आणि वृत्तपत्रांचा सहभाग या वातावरण निर्मितीत मोठा असतो. अशा राज्यस्तरीय निवडणुकांचा संबंध मग राष्ट्रीय राजकारणाशी जोडला जातो आणि या निवडणुकीच्या निर्णयाचे परिणाम राष्ट्रीय राजकारणावर कसे होणार आहेत, कोण मजबूत होणार, कोणाच्या प्रभावाला ओहोटी लागणार इत्यादी मुद्द्यांवर मतमतांतरांचे मोहोळ उठविले जाते. भाकितांचा महापूर आणला जातो. प्रत्यक्षात निवडणुकीनंतर त्यांच्यापैकी बहुतेक अनुमाने फोल ठरतात, असा नेहमीचा अनुभव आहे. तरीही हे सर्व राजकीय कर्मकांड प्रत्येक निवडणुकीपूर्वी जीवाच्या आकांताने केले जाते. या बिहारच्या निवडणुकीआधीही असाच अनुभव येत आहे. मात्र, तरीही ही निवडणूक काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांनी युक्त आहे.

बिहार हे भारतातील एक मोठे राज्य आहे. तेथे विधानसभेच्या २४३ आणि लोकसभेच्या ४० जागा आहेत. अर्थातच, तेथील निवडणूक सर्व राजकीय पक्षांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. या राज्यातील जनतेला एका पक्षाची किंवा आघाडीची सत्ता प्रदीर्घ काळ ठेवण्याची सवय आहे. याचा अर्थ असा, की दर पाच वर्षांनी सत्तांतर येथे होत नाही. विद्यमान राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार येथे २००५ पासून आहे आणि मधला दीड ते दोन वर्षांचा कालावधी वगळला, तर याच आघाडीच्या हाती सत्ता आहे. आणखी एक वैशिष्ट्ये असे की, साधारण सहा महिन्यांचा कालावधी वगळता संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार हेच मुख्यमंत्री आहेत. त्यांनी आणि त्यांच्या पक्षाने १९९८ पासून किमान चार वेळा आघाड्या बदलल्या आहेत. प्रथम ते लालू प्रसाद यादव यांच्यासमवेत होते. नंतर १९९८ ते २०१३ ही सलग पंधरा वर्षे ते भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत राहिले. २०१४ ची लोकसभा निवडणूक स्वबळावर लढविण्याचा त्यांचा प्रयत्न सपशेल फसला. नंतर पुन्हा लालू प्रसाद यादव, मग राष्ट्रीय लोकशाही आघाडी, नंतर पुन्हा विरोधी आघाडी आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीपासून पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडी असा त्यांचा प्रवास आहे. तथापि, प्रत्येक वेळी तेच मुख्यमंत्रीपदी राहिले आहेत. हा भारतीय राजकारणात एक विक्रमच असावा. २००५ पूर्वी सलग पंधरा वर्षे लालू प्रसाद यादव यांच्याभोवती या राज्याचे राजकारण फिरत राहिले होते. चारा घोटाळ्यात शिक्षा झाल्याने लालू यादव यांच्यासंबंधी मतदारांचा भ्रमनिरास झाला आणि त्यातून या राज्यात नितीश कुमार युगाचा प्रारंभ झाला. हे युग आजही आहे आणि कदाचित या निवडणुकीनंतरही राहील, अशी शक्यता अनेक मतदानपूर्व सर्वेक्षणांमधून व्यक्त होत आहे.

ही सर्वेक्षणे कितपत विश्वासार्ह, हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न असला, तरी काहीवेळा या सर्वेक्षणांमधून दिशा स्पष्ट होत असते, असाही अनुभव येतो. सध्याच्या घडीला या राज्यात जागावाटपाचा घोळ होत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तुलनेने फारशा गोंधळाविना जागावाटप केले. भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दल या आघाडीतील प्रमुख दोन पक्षांनी त्यांच्या वाट्याला आलेल्या सर्व जागांवर उमेदवार घोषित करून प्रचारात आघाडी घेतली. विरोधी 'महागठबंधन' मध्ये मात्र, अद्यापही म्हणावी तशी एकजूट दिसत नाही. पण त्यांनाही आता सज्ज व्हावे लागेल, कारण वेळ थोडा आहे. मागची २०20 ची विधानसभा निवडणूक अत्यंत चुरशीची झाली होती. अतिशय कमी अंतराने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा निसटता विजय झाला होता. त्यावेळीही मतदानपूर्व सर्वेक्षणांमधून याच आघाडीला सुखावह बहुमत मिळेल, अशी भाकिते करण्यात आली होती. तथापि, जसजशी निवडणूक पुढे गेली, तशी चुरस वाढत केली. ती निवडणूक कोरोनाच्या सावटाखालची होती आणि पाच टप्प्यांमध्ये मतदान पार पडले होते. ही निवडणूक मात्र दोनच टप्प्यांमध्ये होत आहे. गेल्या किमान पाच निवडणुकांच्या नंतर प्रथमच इतक्या कमी टप्प्यांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. या वेळापत्रकाचाही काही परिणाम निवडणुकीच्या निर्णयावर होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रतिस्पर्धी आघाड्या, त्यांच्यातील जागावाटप, निवडणुकीतील मुद्दे, आरोप-प्रत्यारोप, उखाळ्या-पाखाळ्या आदींचा विचार करता ही निवडणूक मागच्या निवडणुकीचीच प्रतिकृती वाटत आहे.

दोन प्रमुख पक्ष किंवा आघाड्या यांच्यामध्ये मतदार विभागले गेले असतील तर तिसऱ्या नव्या पक्षाला प्रभाव पाडता येणे कठीण असते. महाराष्ट्रातील 'मनसे'च्या उदाहरणावरून याची प्रचीती येते. आता बिहारमध्ये काय होते, हा औत्सुक्याचा विषय आहे. मात्र, या निवडणुकीचा निर्णय काहीही लागला, तरी राष्ट्रीय राजकारणावर विशेष परिणाम होईल, असे सध्यातरी दिसत नाही. मात्र, राजकीय पक्षांची किंवा आघाड्यांची प्रतिष्ठा प्रत्येक लहान-मोठ्या निवडणुकीप्रमाणे येथेही पणाला लागली असल्याने त्यांच्याकडून जीव तोडून संघर्ष केला जाईल, असे निश्चितपणे म्हणता येते. १४ नोव्हेंबरला नेमके चित्र स्पष्ट होणारच आहे.

## सोमवारी ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची प्रवचन सेवा

बीड । प्रतिनिधी



**बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे.**

या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २०/१०/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## व्यसनधीनता एक गंभीर मानसिक आजार-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

वाढती व्यसनाधीनता हे वाढत्या गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण बनले आहे. मात्र, दारू पिणे, सिगारेट ओढणे, चरस, गांजा, नशेच्या गोळ्यांचे सेवन हे मनोविकार आहे, हे लोकांना माहीतच नाही. त्यामुळे नशा करणारे व्यक्ती हळूहळू या मादक पदार्थांच्या आहारी जाऊन व्यसनाधीन बनतात. त्यातून अनेक जण हिंसक होऊन जीवघेणा हल्ला, खून हे असे अनेक समाजघातक कृत्ये घडतात. तर वेळीच आणि योग्य उपचाराने ९५ टक्के रुग्ण बरे होऊन मानसिक आणि सामाजिक स्वास्थही सुदृढ होते.

**वाईट सवय म्हणून वाऱ्यावर सोडू नका !**

व्यसनाधीनता हे मानसिक आजार असल्याने वेळीच, योग्य औषधोपचाराने बराही होऊ शकतो. त्यामुळे त्याला वाईट सवय लागली, तो वाया गेला. असे समजून त्याला वाऱ्यावर न सोडता नशेखोरीच्या या संकटातून सावरण्याची संधी आणि आधार द्या. यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन डॉ.टेकाळे यांनी केले* दारू पिणे, सिगारेट ओढणे हे मानसिक आजार आहेत ? होय, तंबाखूसह बिडी, सिगारेट, बियर, दारू, गांजा, भांग, अफू या नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन हे मानसिक आजाराच आहेत. नशेच्या गोळ्या घेणे हे सुद्धा एक घातक मनोविकार अनेकांना जडला आहे. झिंग येण्यासाठी इतरही अनेक घटक, पदार्थांचा सर्रास वापर होतो. वेळीच, योग्य औषधोपचाराने हे रोखता येते.तरुणवर्ग व्यसनांमध्ये गुरफटतोय ? भावनिक चलबिचलता आणि जीवनात थ्रिल म्हणून किशोरवयीन मुलांमध्ये नशेखोरीचे प्रमाण वाढत आहे.



अगदी शाळकरी मुलेसुद्धा आता सिगारेट, बियर, दारूचे सेवन करू लागले आहे. त्यापुढे गांजा, चरस, अफू, कोकिन, नशेच्या गोळ्यांची चटक बहुसंख्य युवापिढीला लागली आहे. तरुण मुलीही या विळख्यात अडकत असल्याने याकडे पालकांनी, समाजाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

**व्यसनांना नाही कसे म्हणायचे?**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यसनांच्या सवयी लागण्याआधीच नाही म्हणायचे. दुसरे म्हणजे व्यसनांपासून मुक्त झाल्यावर मनाचा ठाम निश्चय करा. मित्रांनी, कुणी आग्रह धरला तर सरळ आणि स्पष्ट शब्दांत नाही म्हणा. कुटुंबीयांसोबत वेळ घालवा. सतत कामांत व्यस्त आणि स्वस्थ रहा.नशेखोरीतून गुन्हेगारी फोफावते ? नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. नशा करण्यासाठी अमली पदार्थ मिळाले नाही की मग चिडचिड, हिंसकवृत्ती, नशा भागवण्यासाठी चोरी, गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावते. हे त्या व्यक्तीसाठी, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे पालकांनी काय काळजी घ्यावी? ालकांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, ते इंटरनेटचा काय वापर करतात, मोबाईलवर काय बघतात, मित्र कोण आहेत. याची माहिती घेत राहावी, मुलांसोबत गप्पा माराव्या, त्यांना बोलते करावे. मैदानी खेळ खेळावे. गायन, वादन आणि वाचनासह आवडते छंद जोपासावे आज घडीला हजारो-लाखो तरुण नशेखोरीत गुरफटल्याने गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत आहेत. याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. व्यसनांमुळे शारीरिक,मानसिक,,आर्थिक आणि कौटुंबिक हानी होते. योग्य मार्गदर्शन आणि उपचाराने या विळख्यातून बाहेर पडता येते. परंतु पहिल्यांदाच व्यसनांना नाही म्हणणे हे त्याहून चांगले असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

## शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करा-जगदाळे

बीड । प्रतिनिधी

**राज्यातील सर्व शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.**

या निवेदनात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर म्हणतात की, संपूर्ण देशात आणि महाराष्ट्र राज्यात दिवाळी सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी दिवाळी सणाच्या निमित्ताने राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे नियमित वेतन हे दिवाळी सणाच्या पूर्वी केले जाते. परंतु आता दिवाळीचा सण सुरू होण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही अद्याप राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन झाले नाहीत. शासनाने ज्या प्रमाणे गौरी गणपती सणाला राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन लवकर दिले होते. त्याच प्रमाणे दिवाळी सणाच्या औचित्य साधून सर्वसामान्य शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करून सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. दरम्यान आता शासन काय निर्णय घेते याकडे राज्यातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या आष्टी येथील दोन्ही अधिकाऱ्यांची नियुक्ती राजकीय हेतूने व पक्षपाती-खाडे

आष्टी । प्रतिनिधी

**मराठवाड्यात विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पदावर नियुक्ती देताना विद्यमान तहसीलदार यांची नियुक्ती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सर्व तालुक्याच्या ठिकाणी केलेली आहे. परंतु आष्टी येथे सध्या कार्यरत असलेल्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी या पदावर नियुक्ती न करता बीडचे श्री नरेंद्र कुलकर्णी तहसीलदार (जि का) बीड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे ती राजकीय हेतूने प्रेरित आहे.**



आष्टी विधानसभा निवडणूक २०२५ मध्ये उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्या बाबतीत निवडणूक आचारसंहिता प्रक्रियेच्या अंमलबजावणीच्या अनेक तक्रारी असताना त्यांना मात्र निवडणूक निर्णय अधिकारी पाटोदा येथे नियुक्ती देण्यात आलेली आहे. श्री नरेंद्र कुलकर्णी हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे तहसीलदार या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे गौण खनिज चा कारभार आहे. आष्टी तालुक्यातील अनेक भू माफिया, खनिज माफिया, राजकीय हित संबंधाने सक्रिय असून त्यांचे श्री नरेंद्र कुलकर्णी यांच्याशी संबंध आहे. अनेक प्रकरणे त्यांच्याकडे प्रलंबित असून ते जिल्हा परिषद /पंचायत समिती २०२५ चे भावी उमेदवार आहेत. सन २०२५ च्या आष्टी विधानसभा निवडणुकीत तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीच्या आचारसंहिता भंग बाबत अनेक तक्रारी असताना त्यांची चौकशी न करता त्यांचेच जबाब घेऊन प्रकरणे निकाली काढण्यात आलेले आहेत. निवडणूक प्रक्रियेतील कर्मचारी सत्ताधारी पक्षाचे समर्थक व प्रचारक आहेत. विधानसभेच्या मतदाना दिवशी मुर्शदपूर येथील मतदान केंद्रावर केंद्र क्रमांक २१०, २११, २१२ सायंकाळी ५:३० वा तुफान मारामाऱ्या झालेल्या होत्या त्यानंतर गाव गुंडांनी आष्टी शहरात दहशत पसरवून व्यापार पेठ संपूर्णपणे बंद करण्यात आलेली होती. पोलीस स्टेशन आष्टी येथे रात्री १२ वाजेपर्यंत २५० ते ३०० लोकांचा जमाव जमा झालेला होता. ही घटना निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस प्रशासनाने दडपवून टाकलेली आहे.श्री नरेंद्र कुलकर्णी हे अनेक वर्षापासून बीड येथेच सेवेत कार्यरत आहेत त्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी तसेच तहसीलदार आष्टी यांना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आष्टी यांना नियुक्ती बाबत कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य, मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, मा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## पान ६ वरून...

### बाजारात सोयाबीनला

बाजारात विक्री शिवाय पर्याय राहिला नाही. शासनही या लुटीच्या पाठीशी असल्याचे वाटत असून आजपर्यंत शासकीय दराचे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झालेले नाहीत. शेतकऱ्याच्या सोयाबीनला सध्या बाजारात ३५०० ते ३८०० रुपयांचा भाव मिळत असून शासकीय दर ५३३८ रुपये आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. महायुती सरकारने तात्काळ शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

-----------

### दसरा मेळाव्यातून सोन्याची

यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने या संदर्भात तपास सुरू केला. खबर्या मार्फत माहिती मिळाली की, सोन्याची चैन विकण्यासाठी तो बीड मध्ये थांबला आहे. अशी माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने चोरटा आकाश सोपान ससाणे (रा.राजूती ता.जि.बीड) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडुन दोन तोळ्याची सोन्याची साखळी जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शिवाजी बंटेवाट, सहा. पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, श्री आशोक दुबाले, श्री सोमनाथ गायकवाड, श्री आनंद मस्के, श्री बाळी सानप, श्री यादव, सिध्देश्वर मांजर यानी केले. संबंधित आरोपीला अंमळनेर पोलिसांच्या ताब्यात दिले.

------------

### क्षीरसागर मुक्त

शिरोळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून सर्व बीड शहरातील जनतेला आवाहन केले आहे की आपण बीड शहराला भकास करणाऱ्या लोकांना कुठलेच मतदान रुपी आशीर्वाद देऊ नका त्यांना दारातही उभे करू नका त्यांना कुठलाच थारा देऊ नका आणि यांना यांची जागा दाखवा असे आव्हान नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील तमाम मतदार बंधू आणि भगिनी यांना केले आहे तसेच भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तथा महाराष्ट्राच्या मंत्री आदरणीय पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे या भगिनी ज्या उमेदवार देतील तो उमेदवार आम्ही मोठ्या ताकतीने निवडून आणू आणि बीड नगरपालिका सर्व ताकद लावून क्षीरसागर मुक्त करु व सर्व बीड शहरातील जनतेची सेवा भारतीय जनता पार्टीने दिलेला नगर अध्यक्षपदाचा उमेदवार निवडून आणून व सर्व नगरसेवक निवडून आणून दिलेले हे येणाऱ्या भविष्यकाळात बीड शहरातील सर्व नागरिकांची सेवा करतील असे असे मनोगत नवनाथ अण्णा शिराळे यांनी प्रसिद्धी माध्यमासी बोलताना थोडक्यात विचार व्यक्त केले आता पंकजाताई यांच्या आदेशाची आम्ही वाट पाहत आहोत की ताई कोणता उमेदवार देतात तो उमेदवार आम्ही पूर्ण ताकतीने निवडून आणणार व बीड नगरपालिका ही कायमची शिरसागर मुक्त करणार

-----------

### कपिलधारवाडीतील

आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या मदतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

------------

### सरसगट मदतीच्या नावाखाली

मीठ लावण्यासारखी असून या परिस्थितीत किसान सभा पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणार आहे. ४२ रुपये गुंठ्यानं हेक्टरी ४२८१ रुपये ची अतिवृष्टीची मदत काही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होऊ लागली आहे जी अत्यंत तुटपुंजी व तोंडाला पान पुसणारी आहे.बुजलेल्या, खचलेल्या विहिरी यासाठी एमआरजीएस अंतर्गत केवळ ३० हजार रु मदत, या विरोधात तर कर्जमाफी आणि हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करा यासाठी किसान सभा बलिप्रतिपदेच्या दिवशी दि २२ ऑक्टोबर रोजी इडा पिडा टळो बळीच राज्य येवो यासाठी गावा-गावात, चौका-चौकात शेतकरी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन करणार आहेत.

## पान १ वरून...

### ओबीसीच्या मुळावर जे जे

करा राज्यात ५४ टक्के ओबीसी,१३ टक्के दलीत, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण त्यानंतर मुस्लिम आणि जे शिल्लक राहतात तो मराठा समाज असे भुजबळ म्हणाले. दुहेरी लढाई लढणार आहे. एक न्यायालय आणि दुसरी रस्त्यावरची लढाई असे भुजबळ म्हणाले. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथं फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाच काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू असे भुजबळ म्हणाले. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा असा इशारा भुजबळ यांनी दिला. मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितलं आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्टया मागास नाही असे भुजबळ म्हणाले. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकतीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळं यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले. भुजबळ यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर देखील टीका केली. नगरला आले नाहीत, पंढरपूरला आले नाहीत, बीडला आले नाहीत, कुठला दबाव तुमच्यावर आहे. तुम्ही सांगितलं होतं तुमच्याबरोबर आहे. मग तुम्ही का नाही आलात ? असा सवाल भुजबळांनी केला.

-------------

### अंगावर आले तर

एवढी भांडणं लावली, माणसात माणूस ठेवला नाही. लोकसभेच्या आधी ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये सख्खे दोन भाऊ एकमेकांविरोधात लढले. एक निवडून आला, दुसरा पडला. त्यांच्यामध्ये एकमेकांविरोधात आई-बहिणीवरुन शिव्या सुरू झाल्या. इतके विष पेरले गेले आहे. आम्ही काही बोललो तर तो लगेच बोलणार. पण यामध्ये मराठा समाजाचा काहीही फायदा नाही. ओबीसींमध्ये आल्यानंतर मराठा समाजाचे नुकसानच होत आहे. ईडब्लूएसचे आरक्षण गेले त्यामुळे एमपीएससी परीक्षेमध्ये त्यांना तोटा झाल्याचे नुकत्याच लागलेल्या निकालावरुन स्पष्ट झाले. मराठा समाजातील गरिबातील गरीबाचा फायदा करायचा असेल तर त्यांना ईडब्लूएस शिवाय पर्याय नाही. कशाला त्या बिनडोक माणसाच्या नादाला लागताय? आपणच लई वाचाळ आहे असे त्याने समजायचे कारण नाही. आम्हालाही आमच्या भाषेत बोलता येते. दसऱ्याचा मेळावा संपल्यावर त्याने १९९४ चा जीआर काढा असे म्हटले. वंजारी समाजाचं दोन टक्के आरक्षण काढा असे त्याने म्हटले. अरे पण काढायचे राहू द्या, न्यायाने द्यायचे शिका. आजही मराठ्यांनी त्यांचे वेगळे आरक्षण घ्यावे, ईडब्लूएसमधून घ्यावे. आमचा त्यांना विरोध नाही. पण आमच्या ताटातील काही घेत असाल तर आम्ही त्याला विरोध करणार. आपली ताकद ही भुजबळ साहेब आहेत. ते देशाचे नेते आहेत, आपल्या ओबीसी समाजाचे आरक्षण त्यांच्या नेतृत्वाखाली आपण टिकवून ठेऊ. आपले ओबीसी आरक्षण आपल्याला टिकवायचे आहे. यापुढे कुणाला घाबरायचे नाही. कुणी अंगावर आले तर त्याला शिंगावर घ्यायचे. आपसातले वाद बाजूला ठेवा. आता येणाऱ्या नगरपंचायत, जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत. त्यामध्ये एकमेकांच्या विरोधात राहू नका, एकीने राहा. त्यामध्ये आपली ताकद दाखवून द्या, असे धनंजय मुंडे म्हणाले.

-----------

### बीड जिल्ह्यासाठी १०२ कोटी

वितरित केली जाणार आहे.प्रत्येक तालुक्यात महसूल, कृषी आणि पंचायत विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संगणकीकृत प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात येत आहे . तहसील कार्यालयांत विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आले असून , प्रत्यक्ष पडताळणीनंतरच निधी वर्ग केला जात आहे . प्रशासनाची तयारी व बैठकींचा आढावा : बीड तहसीलदार यांच्या कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सायंकाळी स्वतः अनुदान वाटपाचा आढावा घेतला . उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे तसेच महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी , संगणक ऑपरेटर यावेळी उपस्थित होते . संगणक प्रणालीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची माहिती तपासून पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले . यावेळी जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की '' एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये आणि मदतवाटप पारदर्शक पद्धतीनेच व्हावे ''. मदत वितरणासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पार पडेल , तसेच बँक खात्यांमध्ये थेट निधी जमा होणार आहे.शासनाने दिलेल्या सूचनांनुसार लाभार्थ्यांची यादी तहसील व जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली तपासावी . कोणत्याही अपात्र व्यक्तीस मदत मिळणार नाही याची खात्री करावी . मदत देताना सर्व निकष व शासन निर्णयातील नियमांचे पालन आवश्यक आहे . निधीच्या वापरावर लेखा परीक्षण कार्यालय आणि महालेखापाल कार्यालयाची नजर राहणार आहे . शासन निर्णयानुसार , ही मदत आर्थिक वर्ष २०२५२६ मधील उपलब्ध निधीतून वितरित केली जाणार असून , सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे . पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा होणार असून , कृषी उत्पादन पुनर्संचयित करण्यासाठी ही मदत महत्त्वाची ठरणार आहे . राज्य शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना वेळेवर मदत देण्यासाठी प्रशासन सज्ज राहावे , असे निर्देश महसूल विभागाचे सह सचिव संपत सूर्यवंशी यांनी दिले आहेत .

-----------

### शेतकऱ्यांसाठी उद्धव ठाकरे

खात्यावर टाकावेत. कर्जाचे पुनर्गठन नव्हे तर कर्जमाफी करा, ही आपली मागणी आहे. आत्ता सरकारच्या मदतीपैकी फार तटपुंजी जेमतेम मदत शेतकऱ्यांच्या हातात पडत आहे. नुकसान भरपाई नाही तर मोलमजुरी मिळाल्यासारखे त्यांना पैसे मिळत आहेत. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. मी मुंबईत असलो तरी माझा अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे आदी नेत्यांशी संपर्क सुरू असतो. तिकडे काय चालले आहे, याची मला संपूर्ण माहिती मिळते. मी तिकडे पुन्हा दिवाळीनंतर येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

--------

### भूपेंद्र पटेलांच्या मंत्रिमंडळात १९

मंत्रिमंडळच बदलण्यात आले आहे. नव्या मंत्रिमंडळात कोण असेल हेही स्पष्ट झाले आहे. क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी आमदार रिवाबा जडेजा यांच्यासह तीन महिलांना मंत्री केले आहे. भूपेंद्र पटेल यांच्या आधीच्या मंत्रिमंडळातील ११ मंत्र्यांना वगळण्यात आले असून फक्त ६ जणांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे.

------------

### नातवाने जंगलात सोडलेल्या

गायकवाड सापडल्या होत्या. स्थानिकांनी पोलिसांना कळवल्यानंतर त्यांना कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तपासात नातू सागर शेवाळे याला आजीच्या उपचाराचा खर्च परवड नव्हता. यामुळे त्याने आजीला आरेच्या जंगलात सोडले होते. उपचारानंतर आजीला उत्तनमधील आश्रमात दाखल करण्यात आले होते.

------------

### डिजिटल अटक घोटाळ्याची सुप्रीम

सर्वोच्च न्यायालयाचे बनावट आदेश दाखवले आणि अटकेची तसेच मालमत्ता जप्त करण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून अनेक बँक व्यवहारांद्वारे १ कोटी ५० लाख रुपये हस्तांतरित करवून घेतले.'' खंडपीठाने स्पष्ट केले की, या प्रकरणांमध्ये न्यायिक कागदपत्रांची हेराफेरी आणि सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या नावाचा, शिक्क्याचा आणि न्यायिक अधिकाराचा गुन्हेगारी गैरवापर ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आणि सुनावणी आता सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली होण्याची शक्यता आहे.

-------------

### मध्यमवर्गीयांना हक्काचे घर मिळणार ; मोदी

असे मंत्रालयाने म्हटले आहे. १ सप्टेंबर २०२४ रोजी लागू झालेल्या या योजनेचे उद्दिष्ट पुढील पाच वर्षांत १ कोटी कुटुंबांना पक्की घरे प्रदान करण्याचे आहे. जे , किंवा श्रेणींमध्ये येतात आणि ज्यांच्याकडे देशात कुठेही पक्के घर नाही, अशा लोकांना याचा फायदा होणार आहे. सरकारने या योजनेअंतर्गत एकूण २.५ लाख कोटी रुपयांची केंद्रीय मदत वाटप केली आहे.

## थोडक्यात...




### मिलिया बॉईज हायस्कूलमध्ये उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा

बीड ।प्रतिनिधी

**शैक्षणिक, ऑलिंपियाड, क्रीडा, सांस्कृतिक तसेच अभ्यासक्रमेतर क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी मिलिया बॉईज हायस्कूल,बीड येथे मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य पदक आणि प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला.**

हा कार्यक्रम शाळेच्या सभागृहात अतिशय उत्साहाने पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिव खान सबिहा बेगम होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, प्राचार्य फैसल अहमद चाऊस, असिस्टंट एच.एम. सिद्दीकी,अलहाज सय्यद मोईन प्राध्यापक, तसेच सामाजिक कार्यकर्ते मुसा खान पठाण उपस्थित होते. शाळेचे पर्यवेक्षक, शिक्षकवर्ग, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती या सोहळ्याची शोभा वाढवणारी ठरली.प्रमुख पाहुणे पी.आय. शितल कुमार बल्लाद यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले की, ''यशाचा खरा पाया म्हणजे सातत्य आणि शिस्त, शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडा आणि संस्कार यांनाही समान महत्त्व द्यावे.''ऑलिंपियाड परीक्षा, शैक्षणिक स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा तसेच क्रीडा स्पर्धांमध्ये उजवी कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य, कांस्य पदके आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.सचिव खान सबिहा बेगम यांनी सांगितले, ''आमच्या विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांत आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांचा परिश्रम आणि चिकाटी हीच आमच्या संस्थेची खरी शान आहे.''कार्यक्रमात नेतृत्वगुण, टीमवर्क आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी विशेष सन्मानपत्रेही देण्यात आली, ज्यातून शाळेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनाचा प्रत्यय आला.शेवटी अजाज अख्तर सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या यशाचा आणि आत्मविश्वासाचा उत्सव ठरलेला हा सोहळा उपस्थित सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

### ॲड.कवठेकर यांना माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर

मुंबई ।प्रतिनिधी

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड प्रकाश दादा कवठेकर यांना माता सावित्री / फातिमा सार्वजनिक वाचनालय कुर्ला ( पूर्व ) मुंबई यांच्या वतीने माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.



याबाबत थोडक्यात माहिती अशी की, बीड येथील उद्योग क्षेत्रामध्ये नाव कमवलेले व मनमिळावू स्वभाव गरजूंना मदतीचा ध्यास सामाजिक कार्याची आवड आणि आदर्श व्यक्तिमत्व या गुणामुळे ड प्रकाश दादा कवठेकर यांनी अल्पावधीतच जनमानसात ठसा उटवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातून स्वतःच्या हिमतीवर प्रगती करून युवकासमोर प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. स्वतः नोकरी न करता व्यवसायामध्ये तेजस इलेक्ट्रिकल च्या माध्यमातून व्यवसायाला सुरुवात केली आणि आज ऑक्सितेज मिनरल वॉटर, तेजस प्रोडक्शन कंपनी, तेजस अर्थमूव्हर्स, तेजस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस डिजिटल मार्केटिंग आदी, या उपक्रमाद्वारे आणि आपल्या सामाजिक बांधिलकी जपत कायम आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल वाचनालयाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून हा पुरस्कार सोहळा दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता माननीय बाळासाहेब ठाकरे समाज केंद्र नेहरूनगर कुर्ला (पूर्व) मुंबई येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाने वतीने केले आहे.

# धारूर पोलिसांची मोठी कारवाई : पोलिस अधीक्षक यांची गुन्हेगारीवर करडी नजर

## पाच गुन्हेगार दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार

**पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले की बीड जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहील. भविष्यातही MPDA, MCOCA तसेच हद्दपारीसारख्या उपाययोजना करून अशा टोळ्यांना धडा शिकवला जाईल.**

किल्लेधारूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी कार्यभार स्वीकारल्या पासून जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. चोऱ्या, घरफोड्या, दरोडे, खून व खुनाचे प्रयत्न, तसेच गुंडगिरी व नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्यांवर लक्ष ठेवत त्यांनी सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना प्रतिबंधक कारवाया वाढविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. यावर धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवदास वाघमोडे यांनी पाच गुन्हेगारावर एम पी डी अंतर्गत कारवाई केली आहे

या मोहिमेअंतर्गत धारूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि देविदास वाघमोडे यांनी धारूर आणि केज तालुका तसेच लगतच्या भागात सक्रिय असलेल्या सराईत गुन्हेगार टोळीवर मोठी कारवाई केली आहे. यामध्ये आर्यन उर्फ शंकर मधुकर शेप (वय २५, रा. लाडेवडगाव, ता. केज) कल्याण वचिष्ट शेप (वय २७, रा. लाडेवडगाव, ता. केज) उज्ज्वल उर्फ दादा महादेव मुंडे (वय २३, रा. भायजळी, ता. धारूर) गणेश उर्फ संकेत सुरेश गंगात्रे (वय २४, रा. आडस, ता. केज) रंगनाथ पाटील लांब (वय ३४, रा. बनकरंजा, ता. केज) या सर्वांवर जबरी चोरी, दरोडा, खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, रस्ता अडवून मारहाण करणे आणि जनतेत दहशत निर्माण करणे अशा अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. सदर टोळीची वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन धारूर पोलिसांनी १८ जून २०२५ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक कार्यालयास सादर केला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी (केज) यांनी सविस्तर चौकशी पूर्ण करून प्रस्ताव सादर केला. त्यानंतर आरोपींना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. चौकशीनंतर उपलब्ध पुरावे, गुन्ह्यांचा इतिहास आणि जनतेत निर्माण झालेली दहशत लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी १७ ऑक्टोबर २०२५ रोजी आदेश पारित करून सदर पाचही गुन्हेगारांना बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी हद्दपार केले आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके (अपर पोलिस अधीक्षक), श्री. व्यंकटराम (उपविभागीय पोलिस अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि देविदास वाघमोडे (धारूर पो.स्टे.), पो.नि. शिवाजी बंटेवाड (गुन्हे शाखा बीड), पो.उपनि. अभिमन्यु औताडे, पो.शि. आलिम शेख आणि पो.शि. बिबिशन चव्हाण यांनी संयुक्तरित्या पार पाडली.

## वास्तवाच्या अभिव्यक्तीने शिवाजीराव पंडित विभागीय काव्यस्पर्धेत रसिक मंत्रमुग्ध

पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ' मराठी विभागाने' आयोजित केलेल्या ' शिक्षणमहर्षी मा. श्री. शिवाजीराव (दादा) पंडित आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धेत' महाविद्यालयीन युवक कवींनी सादर केलेल्या वास्तवाची अभिव्यक्ती करणाऱ्या कवितांनी रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.




शिक्षणमहर्षी श्री. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त या विभागीय स्तरावरील काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने सभोवतालचे भीषण वास्तव आपल्या कवितांद्वारे युवा कवींनी चित्रित केले. सदर स्पर्धेत बीडच्या मिल्लिया महाविद्यालयाची विद्यार्थिनी सय्यद शिरीन हिने प्रथम पुरस्कार रु. पाच हजार, सन्मानचिन्ह यासह जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे लेखापाल श्री. प्रताप हातोटे यांनी प्रायोजित केलेला रोख रू. अकराशे रुपयांचाही पुरस्कार पटकावला.छत्रपती संभाजीनगरच्या एम. जी. एम. महाविद्यालयाचा विद्यार्थी पवन शेळके याने द्वितीय पुरस्कार रोख रू. तीन हजार, सन्मानचिन्ह आणि महाविद्यालयाच्या स्थानिक विकास मंडळाचे सदस्य श्री. दिलीपभाऊ जाधव यांनी प्रायोजित केलेला रोख रू. अकराशेचा पुरस्कार पटकावला. या भव्य स्पर्धेचा तिसरा पुरस्कार रोख रु. दोन हजार आणि सन्मानचिन्ह विभागून देण्यात आला. अंबाजोगाईच्या स्वा. रा. ति. महाविद्यालयाचा विद्यार्थी अविष्कार जंगले आणि छत्रपती संभाजीनगरच्या विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी विजय तौर यांनी हा विभागून तिसरा पुरस्कार पटकावला. नळदुर्गच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ लोंढे आणि यजमान महाविद्यालयाची विद्यार्थीनी आकांक्षा मकाळ या दोघांना स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी प्रायोजित केलेला रोख रू. एक हजार चा उत्तेजनार्थ पुरस्कार विभागून देण्यात आला. पाटोदाच्या जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात सकाळपासूनच काव्यस्पर्धेचा उत्साह संचारला होता. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दूरदूरहून विद्यार्थी कवी दाखल होत होते. स्पर्धेचे उद्घाटक जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी श्री. प्रमोद गोरकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास गढीच्या श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे अध्यक्षस्थानी होते. जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे लेखापाल श्री. प्रताप हातोटे आणि कवयित्री डॉ. रेखा ढेरे-घोलप या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाटोद्याच्या जय भवानी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे, स्थानिक विकास समितीचे सदस्य श्री. दिलीपभाऊ जाधव, सुप्रसिद्ध नाटककार प्रा. बापू घोक्षे, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान, विद्यापीठ सिनेट सदस्या प्रा. डॉ. कल्पना घारगे, परीक्षक पॅनलचे अध्यक्ष शिघ्रकवी प्रा. डॉ. नामदेव शिनगारे, परीक्षक कवयित्री डॉ. संगीता आहेर, परीक्षक कवयित्री- समीक्षक डॉ. तबस्सुम इनामदार, आणि कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे आदी मान्यवरांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक प्रा. बापू घोक्षे यांनी, सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. कल्पना घारगे यांनी केले. मान्यवरांच्या मनोगतांनंतर लगेचंच काव्यवाचन स्पर्धेला प्रारंभ झाला... युवा कवी आपल्या एकसे बढकर एक काव्यरचना सादर करीत राहिले... प्रेक्षकांची दाद मिळवित गेले.स्पर्धेनंतर दहा मिनिटांच्या अवकाशात स्पर्धेचा निकाल तयार होऊन पुरस्कार वितरण सोहळा जल्लोषात संपन्न झाला... मराठी विभागाचे प्रा. बापू घोक्षे यांनी स्पर्धा आणि पुरस्कार वितरण सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन केले तर मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी आभार प्रदर्शन केले.

## शिक्षक साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रदीप खाडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ७



व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांची निवड करण्यात आल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

परळी वैजनाथ येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी ७ वे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन शिक्षण मार्गच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक अजयकुमार गंडले हे आहेत.तर या एकदिवसीय संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे. या एक दिवसीय साहित्य संमेलनात मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. प्रदीप खाडे हे या संमेलनाचे स्वागतअध्यक्ष पद भूषवणार आहेत. ते नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव आहेत तसेच कै. रामभाऊ अण्णा खाडे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे योगदान आहे. गतवर्षी परळी येथे झालेल्या ६ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणूनही त्यांनी यशस्वी भूमिका पार पाडली होती. या एकदिवसीय संमेलनात परिसंवाद, कथाकथन तसेच भव्य कवी संमेलन होणार असल्याने परळीकरांना साहित्यिक मेजवानी मिळणार आहे.


क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **नाजीम करीम कुरेशी** रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक १७.०१.१९९० रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **कलीम करीम कुरेशी** रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक २०.०७.१९८७ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **शमीम करीम कुरेशी** रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक १५.०५.१९९२ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **मुस्तकीम करीम कुरेशी** रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक १५.०३.१९९५ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **मुसदीक करीम कुरेशी** रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक ०९.०३.१९९९ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **मुंजशरीन करीम कुरेशी** रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक २०.१२.२००४ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **शमीम करीम कुरेशी** रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक १५.०५.२००६ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार **रुजिना करीम कुरेशी** रा. घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक २०.०६.२००६ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार अंबाजोगाई**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.१८ ऑक्टोबर २०२५
४

# कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज


पुणे : राज्यात ढगाळ वातावरण, उन्हाचा चटका आणि उकाडा अनुभवायला मिळत आहे. राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मॉन्सूनने संपूर्ण देशातून गुरूवारीच निरोप घेतला आहे.

राज्यात पालघर, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक आणि कोल्हापूर व पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर विजाच्या कडकडटासह आणि ढगाच्या गडगडाटासह काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर मुंबई, रत्नागिरी, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता आहे. तसेच उर्वरित राज्यात मात्र कोरड्या हवामानाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. शनिवारी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. तसेच



रायगड, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता असून उर्वरित राज्यात कोरडे हवामान राहील. तर रविवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. तर ठाणे, अहिल्यानगर, पुणे, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटाजवळ चक्राकार वारे वाहत आहेत. त्यांची दिशा दक्षिणेकडे झुकलेली आहे. त्यामुळे १८ ऑक्टोबरच्या दरम्यान लक्षद्वीप परिसरात केरळ-कर्नाटक किनाऱ्यालगत कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यात अनेक ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ३३ अंश सेल्सिअसच्या घरात गेला आहे. ऑक्टोबरचा हिटचा चटका अनुभवायला मिळत आहे. पुढील दोन ते तीन दिवस राज्यात उन्हाचा चटका कायम राहून काही भागात पावसाच्या सरी हजेरी लावतील तर विविध भागात ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

# गव्हासाठी वापरा पोटॅशियम नायट्रेट; दाणे भरण्यासह वाढेल उत्पादन



सध्या रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा पिके ही पेरणीचा कालावधी सरू हात आहे. गव्हाच्या योग्य वाढीसाठी पोटॅशियम नायट्रेट (१३-००-४५) हे खत तुम्ही वापरू शकता. या खताचा वापर गव्हाच्या भरदार दाण्यांसाठी महत्वपूर्ण ठरतो. तसेच उत्पन्नातही भरघोस वाढ होते. पोटॅशियम नायट्रेट या खताच्या गहू पिकासाठीच्या वापराबाबत सविस्तरपणे जाणून घेतल्यास मोठा फायदा होतो.

पोटॅशियम नायट्रेटचे फायदे : पोटॅशियम नायट्रेट हे खत पूर्णपणे पाण्यात विरघळते. या खतामध्ये १३ टक्के नायट्रोजन आणि ४५ टक्के पोटॅशियमचे प्रमाण असते. कॅल्शियमचे प्रमाण अधिक असल्याने या खताच्या वापरातून गव्हाची ओंबी ही मोठी आणि दाणे भरदार होतात. हे खत गहू पिकाला पाण्याचा ताण पडल्यास किंवा अतिरिक्त पाणी दिले गेल्यास सुरक्षा रक्षक म्हणून काम करते. इतकेच नाही तर पोटॅशियम नायट्रेट हे खत गव्हासोबतच अन्य पिकांसाठी देखील महत्तवपूर्ण मानले गेले आहे. या खताच्या वापरामुळे गहू पिकाची रोग प्रतिकारशक्ती वाढण्याबरोबरच उत्पादन क्षमता देखील वाढते. या खताच्या वापराने गहू उत्पादन २० टक्क्यांपासून ते ४० टक्क्यांपर्यंतचे वाढू शकते.

वापर करण्याची वेळ : पोटॅशियम नायट्रेट या खताचा वापर प्रामुख्याने खुरपणी झाल्यानंतर लगेचच करावा. जेणेकरून या खताची मात्रा ही पीक मधल्या अवस्थेत आल्यानंतर आणि परिपक्क होईपर्यंत पूर्ण लागू होते. या खताचा वापर ठिबक पद्धतीने पाण्यातून करू शकता. ठिबक पद्धतीने हे खत देताना प्रति लिटर पाण्यासाठी १.५ ते २.५ ग्रॅम खताचे प्रमाण ठेवणे गरजेचे असते. ठिबक व्यवस्था नसल्यास फवारणी पद्धतीने देखील हे खत गहू पिकाला देऊ शकता. हे खत गहू पेरणीनंतर दोन महिन्यांच्या आत द्यावे.

पोटॅशियम नायट्रेटचे फायदे : गव्हाच्या फुटव्यांसाठी फायदेशीर असते. गव्हाच्या मुळांची वाढ झपाट्याने होते. गहू पिकाच्या पानांमध्ये हरितद्रव्यांची वाढ होऊन, उत्पादन वाढीस मदत होते. गहू पिकाला रोग प्रतिकारशक्ती प्रदान करते. गव्हाच्या दाण्यांमध्ये चमक येते. दाण्यांच्या फुगवणीसाठी मदत करते. गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. गहू पिकामध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण वाढण्यासाठी मदत होते. पाण्याचा ताण पडल्यास, पिकाला ताण सहन करण्याची शक्ती प्रदान करते.

# ऊस तोडणी करताना या गोष्टींची घ्या काळजी; उताऱ्यासह वाढेल उत्पादन



सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये ऊस तोडणी हंगाम जोरात सुरू होत आहे. शेतकरी आपला ऊस कारखान्यांना पाठवण्याच्या तयारीत आहेत. मात्र ऊस तोडणी दरम्यान काही गोष्टींची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असते. अन्यथा ऊस तोडणी दरम्यान केलेल्या चुकांमुळे उसाचे वजन, गुणवत्ता, साखर उतारा यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही तर वेळेआधी किंवा तोडणीस विलंब झाल्यानंतरही तोटा सहन करावा लागू शकतो. यासाठी शेतकऱ्यांनी ऊस तोडणी दरम्यान काही गोष्टींची काळजी घेणे खूप गरजेचे असते. जेणेकरून होणारे नुकसान टाळले जाऊ शकते.

तोडणीची योग्य वेळ साधा : ऊस तोडणीला आला याचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे उसाची पाने पिवळी पडतात. ज्यामुळे उसाची पूर्ण वाढ झाल्याचे समजले जाते. उसाची पूर्ण वाढ झाल्यानंतर डोळे फुटण्यास सुरुवात होते. ही डोळे येण्यास सुरुवात झाली की तोडणीला सुरुवात करणे आवश्यक असते. तोडणीला आलेल्या उसाचे ब्रिक्स मूल्य हे १८ किंवा त्याहून अधिक असल्यास अशा उसापासून १० ते ११ टक्के साखर उतारा मिळतो. यापेक्षा कमी ब्रिक्स मूल्य असल्यास असा ऊस अपरिपक्क समजला जातो. उसाचे ब्रिक्स मूल्य तुम्ही रेफ्रेक्टोमीटरचा वापर करून मोजू शकतात.

ऊस तोडणीची योग्य पद्धत : र्वसामान्यपणे महाराष्ट्रात ऊस तोडणी ही कोयता, कुऱ्हाड किंवा काही आधुनिक कटिंग साधने वापरून मजूर पद्धतीने केली जाते. मात्र अशावेळी तोडणीसाठी कुशल मनुष्यबळ असणे आवश्यक असते. उसाची अयोग्य पद्धतीने तोडणी केल्यास वजन आणि साखर उताऱ्यात घट होऊ शकते. उसाच्या रसाची गुणवत्ता देखील खराब होते. याशिवाय अशा उसापासून बेणे तयार केल्यास पुढील वर्षीच्या ऊस उत्पादनाला देखील फटका बसू शकतो. मजूर पद्धतीने ऊस तोडणी ही प्रामुख्याने जमिनीच्या समान पृष्ठभागापासूनच करावी. ऊस तोडणी यंत्रांच्या साहाय्याने केली जात असेल तर उसाचा वरील पानांचा भाग मशीन बाजूला करते आणि जमिनीपासून ते बांडीपर्यंतच्या भागाचे मशीन छोटे तुकडे करते. हे तुकडे हार्वेस्टर बॉक्समध्ये जमा होतात. सामान्यपणे ८ तासात हार्वेस्टर मशीन २.५ ते ४ हेक्टर उसाची तोडणी करते. त्यामुळे ऊस तोडणीची ही आधुनिक पद्धत देखील प्रभावी मानली जाते.

'या' गोष्टींची काळजी घ्या : जमिनीच्या पृष्ठभागापासून ५ सेंमी जरी वरतून तोडणी झाल्यास तुमच्या ऊस उत्पादनात एकरी १.५ ते २ क्विंटलची घट नोंदवली जाऊ शकते. याशिवाय आपण लक्ष न दिल्यास १० सेंमीपर्यंत वरतून ऊस तोडणी झाल्यास एकरी ३ ते ४ क्विंटलचा फटका बसू शकतो. याशिवाय जसे ऊस तोडणी ही अगदी मुळापासून होणे गरजेचे असते. तसेच वरील बांडीच्या भागात देखील जिथपर्यंत कांडी असतात. त्या भागाची देखील योग्य काळजीपूर्वकपणे तोडणी होणे आवश्यक असते.


तोडणीनंतरची काळजी : तोडणीनंतर उसाला जास्त वेळ शेतात ठेवू नये. यामुळे ऊस रसाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन उत्पादन घटू शकते. यामुळे साखर उतारा आणि गूळ उत्पादन यावर परिणाम होऊ शकतो. काही कारणास्तव ऊस शेतात पडून राहिल्यास बांडीकडील भाग वापरून उसाच्या मोळ्या झाकून ठेवाव्यात. किंवा मग उसावर शक्य असल्यास पाण्याची फवारणी करावी. या गोष्टींची काळजी घेऊन तुम्ही आपल्या ऊस तोडणी दरम्यान होणारे नुकसान टाळू शकतात.

# अझोलाचे उत्पादन काढण्याची पद्धत

अझोला ही प्रथिनयुक्त, जलद वाढणारी पाणवनस्पती असून पशुखाद्यासाठी स्वस्त पर्याय आहे. लहान खड्ड्यात (२२ मी.) माती, गाईचे शेण स्लरी व पाणी टाकून सहज लागवड करता येते. नियमित शेण, सुपर फॉस्फेट व सूक्ष्म अन्नद्रव्ये दिल्यास उत्पादन चांगले मिळते. लागवडीपासून १०-१५ दिवसांनी रोज ५००-६०० ग्रॅम काढणी करता येते. २०-२८ सेल्सीयस तापमान व ५०% सूर्यप्रकाशात अझोलाची उत्तम वाढ होते. अझोला ही पाण्यात वाढणारी वनस्पती आहे. तिच्यामध्ये प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे यासारखे पोषकतत्त्व असतात. अझोलाचे उत्पादन कमी जागेत आणि कमी खर्चात घेता येते त्यामुळे पशु आहारासाठी अझोला हा खूप चांगला पर्याय आहे.

अझोलाचे उत्पादन : अझोला शेवाळासारखी पाण्यावर तरंगणारी वनस्पती आहे. त्याची वाढही फार भराभर होते. साधारणत: अझोला तांदळाच्या शेतात किंवा उथळ पाण्याच्या जागी उगवता येतो.

बेडची बांधणी : जमीन सारखी व स्वच्छ करुन घ्यावी. आयताकार स्वरूपात विटा आडव्या रचाव्यात. विटांनी तयार करण्यात आलेल्या आयाताकाराच्या मार्जिनला झाकणारी २ मीटर बाय २ मीटर मापाची एक पातळ यूव्ही स्टॅबिलाइज्ड शीट टाकावी. १० ते १५ किलो चाळून बारीक माती सिल्प्यूलाईन पिटमध्ये टाकावी. त्यानंतर २ किलो शेणाची स्लरी तयार करावी. त्यात ३० ग्रॅम



सुपर फॉस्फेट १० लिटर पाण्यात मिसळून, शीटवर टाकावे. पाण्याची पातळी १० सेमी. वाढविण्यासाठी आणखी पाणी टाकावे. त्यावर सुमारे ०.५ ते १ किलो शुध्द मदर अझोला बेड वर सर्वत्र पसरावा.

बेडचे नियोजन : २० ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि सुमारे १ किलो गाईचे शेण ५ दिवसांत एकदा मिसळावे. ज्यामुळे अझोलाची लवकर वाढ आणि रोजची ५०० ग्रॅमची उपज कायम राहील. मायक्रोन्यूट्रिंट मिक्स यामध्ये मॅग्नेशिअम, लोह, तांबे, गंधक इत्यादी देखील आठवड्यातून एकदा मिसळावे म्हणजे अझोलातील खनिज घटकांची वाढ होईल. ३० दिवसांतून एकदा, सुमारे ५ किलो बेड माती नवीन मातीने बदलून टाकावी, यामुळे नत्राची वाढ आणि सूक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता यांच्यावर उपाय होईल. बेडमधील २५ ते ३० टक्के पाणी दर १० दिवसांनी बदलावे. बेड स्वच्छ ठेवावा. दर सहा महिन्यांनी पाणी व माती बदलावी आणि अझोला लावावा. जेव्हा कीटक किंवा रोग लागणे सुरु होईल तेव्हा अझोलाच्या शुध्द कल्चरने युक्त असा ताजा बेड लावावा. सध्या अझोलाच्या प्रायोगिक उत्पादनासाठी उच्च प्रतीच्या एच.डी.पी.इ. व एल.डी.पी.ई. यांच्या ५ थरांचे लॅमिनेशन करुन आय.एस.आय. मानांकनानुसार बनविलेल्या कापडातून बनविलेला हौद (बेड) बाजारात मिळतो.

काढणी पद्धत : अझोलाची वाढ झपाट्याने होते. १०-१५ दिवसांत हौद भरून जातो. त्या वेळेपासून, ५००-६०० ग्रॅम अझोलाची काढणी दररोज होऊ शकते. १५ व्या दिवसापासून एखाद्या चाळणी किंवा ट्रेच्या मदतीने अझोला काढावे. काढणी केलेला अझोला ताज्या पाण्याने धुतल्यावर गाईच्या शेणाचा वास निघून जाईल.

वाढीसाठी पर्यावरण घटक : अझोला २०ते २८ सेल्सियसच्या तापमानात चांगला वाढतो. शिवाय ५० टक्के पूर्ण सूर्यप्रकाश असावा. सावलीची जाळी वापरुन प्रकाशाची तीव्रता कमी करता येईल. अझोलाची बेडमधील गर्दी टाळण्यासाठी अझोला बायोमास दररोज काढून जनावरांना खाऊ घालावा. ताज्या बायोगॅस स्लरीचा वापर केला जाऊ शकतो. न्हाणीघर आणि गोठ्यातील सांडपाणी हौद भरण्यासाठी वापरले जाऊ शकते. ज्या क्षेत्रांत ताज्या पाण्याचा अभाव आहे तेथे कपडे धुतल्यानंतर उरलेले पाणी (दुसऱ्यांदा खंगाळलेले) देखील वापरले जाऊ शकते.




## महत्वाच्या घटना

१२१६ : इंग्लंडचा राजा जॉन मृत्यूमुखी पडल्यामुळे त्याचा ९ वर्षाचा मुलगा हेन्री हा राजेपदी आरुढ झाला.
१७८१ : ब्रिटिश जनरल कॉर्नविलास अमेरिकेला शरण गेले, यामुळे अमेरिकन क्रांती युद्ध संपले.
१८१२ : नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोच्या सीमेवरुन माघार घेतली.
१८५३ : अमेरिकतील हवाना येथे जगातील पहिली पिठाची गिरणी सुरु करण्यात आली.
१९३३ : जर्मनी लीग ऑफ नेशन्स मधून बाहेर पडले.
१९३५ : इथिओपियावर आक्रमण केल्यामुळे राष्ट्रसंघाने इटलीवर आर्थिक निर्बंध घातले.
१९४४ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजा फिलीपाइन्सला पोचल्या.
१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द
१९९३ : पुण्याजवळील महारेडिओ दुर्बिण प्रकल्पाचे जनक आणि शास्त्रज्ञ प्रा. गोविंद स्वरुप यांना सर सी. व्ही. रामन पदक जाहीर
१९९४ : रुद्रवीणावादक उस्ताद असद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' जाहीर.
२००० : पार्श्वगायिका आशा भोसले यांना राज्यशासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान
२००५ : मानवतेविरुद्ध गुन्ह्यांसाठी सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध खटला सुरू झाला.
२०१९ : सैनिकी शाळेत मुलींनाही प्रवेश मिळण्याच्या प्रस्तावाला स्वरक्षण मंत्री यांची मंजुरी मिळाली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०२ : दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण कथालेखक. 'किशोरीचे हृदय', 'विद्या आणि वारुणी' ही कादंबरी, 'तोड ही माळ' हे नाटक व अनेक कथासंग्रह त्यांनी लिहीले. (मृत्यू: ३१ मे १९७३ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९१० : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय- अमेरिकन खगोल वैज्ञानिक. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९९५)
१९२० : पांडुरंगशास्त्री आठवले कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदि शास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २५ आक्टोबर २००३)
१९२५ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (मृत्यू: १७ एप्रिल २००१)
१९२९ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित गांधीवादी विचारधारी भारतीय समाजसेविका निर्मला देशपांडे यांचा जन्मदिन.
१९३६ : शांताराम नांदगावकर गीतकार (मृत्यू: ११ जुलै २००९)
१९५४ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १९ सप्टेंबर २००२)
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, राजकारणी आणि पंजाब राज्यातील गुरदासपूर येथील विद्यमान संसद सदस्य अजयसिंग देओल उर्फ सनी देओल यांचा जन्मदिन.
१९६१ : अजय सिंग देओल ऊर्फ 'सनी देओल' अभिनेता

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१६ : जॉन इंग्लंडचा राजा (जन्म: २४ डिसेंबर ११६६)
१७४५ : आयर्लंड देशातील निबंधकार, कवी, आणि व्यंगचित्रकार जोनाथन स्विफ्ट यांचे निधन.
१९३४ : विश्वनाथ कार ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक. १८९६ मधे त्यांनी एक छापखाना काढून 'उत्कल साहित्य' नावाचे सर्वस्वी साहित्याला वाहिलेले दर्जेदार नियतकालिक सुरू केले. (जन्म: २४ डिसेंबर १८६४)
१९३७ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ३० ऑगस्ट १८७१)
१९५० : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८८७)
१९८६ : मोझांबिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३३)
१९९५ : बाल कलाकार म्हणून पुढे आलेल्या व नंतर सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या सलमा बेग ऊर्फ 'बेबी नाझ' यांचे निधन. (जन्म:)
२००३ : बोत्सिया व हर्जेगोविना देशाचे पहिले अध्यक्ष अलिजा इझेटबेगोविच यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# राज्यस्तरीय व विभागस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धासाठी तयारीला वेग

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी नियोजन बैठक

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरीय तसेच विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यंदाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहा पूर्वतयारी बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस अधीक्षक प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे अधिकारी, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ''ही स्पर्धा म्हणजे जिल्ह्यातील तरुणाईसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. खेळाडूंना योग्य सुविधा, निवास, भोजन व वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होणं आवश्यक आहे.'' त्यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून स्पर्धेच्या तयारीत कोणतीही कमतरता राहू न देण्याचे निर्देश दिले.तसेच क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट आलेल्या खेळाडूंना उत्तम प्रकारची ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साहा वाढावा यादृष्टीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा.



या स्पधेत १७ वर्षे मुले व मुली. सहभागी होऊ शकतील. या स्पर्धा दि. २९ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान बीड येथे छत्रपती संभाजी मैदान येथे व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्यात येणार आहेत. जिल्हाभरातून आणि विभागातील विविध तालुक्यांतून खेळाडू सहभाग घेणार आहेत.सर्व खेळांच्या मैदानांची साफसफाई व आवश्यक दुरुस्ती तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करावी, तसेच प्रत्येक मैदानावर प्राथमिक उपचार किट उपलब्ध ठेवण्यात यावे.पोलीस विभागाने वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. स्थानिक विद्यालये व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात यावी. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून ही स्पर्धा एक आदर्श आयोजन ठरेल, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. जिल्हास्तर व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती'' यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ''विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रम'' विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रमासाठी जिल्हा व विभागस्तरीय युवा महोत्सव जिल्हा व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली ''विकसित भारत २०४७'' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक नवोपक्रम बैठकीत युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, युवक-युवतींची निवड प्रक्रिया, पारंपरिक व आधुनिक कलांच्या सादरीकरणाची रूपरेषा, प्रचार व प्रसाराचे माध्यम, तसेच आयोजनासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्वतयारी यावरही चर्चा करण्यात आली. ''विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील कलागुणांना चालना मिळेल.'' तसेच, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने नियोजन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या महोत्सवातून केवळ सांस्कृतिक उन्नतीच नव्हे, तर सामाजिक एकात्मता, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता अशा अनेक विषयांचा समावेश असणार आहे. शेवटी सर्व उपस्थितांनी उत्साहपूर्वक सहभाग देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. बैठकीपूर्व जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रस्ताविक केले.

# फार्मर आयडी प्रमाणित न झाल्याने शेतकऱ्यांत संताप




लातूर

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने केंद्र सरकारने फार्मर आयडी योजना अनिवार्य केली. शेतकऱ्यांनी महा ई-सेवा केंद्रांमार्फत फार्मर आयडीसाठी अर्ज करून आपली जबाबदारी पार पाडली असली, तरी हे आयडी कळंब तहसीलदार कार्यालयाकडून प्रमाणित न झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना पीक विमा, अनुदान, महाडीबीटीवरील योजना, ठिबक व तुषार सिंचन, कडबा कटर, शेती अवजारे, यांसारख्या अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळू शकत नाही. यंदा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शासनाकडून अनुदान व विमा रक्कम वितरित होणार आहे. मात्र तहसीलदार कार्यालयातील प्रमाणन प्रक्रियेत होत असलेला विलंब शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. कळंब तालुक्यातील मस्सा येथील शेतकऱ्यांचे मागील वर्षाचे खरीप पिकांचे अनुदान अद्यापही मिळाले नाही. यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. अनुदानाच्या चौकशीसाठी तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत.

याकडे लक्ष देऊन तत्काळ रखडलेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे मस्सा येथील शेतकऱ्यांचे २०२४-२५ मध्ये अतिवृष्टीने खरीप पिकांचे नुकसान वतीने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हेक्टरी १३ हजार ६०० रुपये अनुदान होते. येरमाळा दहिफळ मंडळातील काही शेतकऱ्यांना मिळाले. परंतु अद्यापही परिसरातील ५० टक्के शेतकऱ्यांना या अनुदानाचा छदामही मिळाला नाही. वर्षभरापासून फक्त आश्वासन देऊन शेतकऱ्यांची बोळवण केली. शासनाने रखडलेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांचे अनुदान रोखणाऱ्या महाराष्ट्र बँकेला सतीश घाटगेनी विचारला जाब

## होल्ड केलेले खाती अनहोल्ड होण्यास सुरुवात



घनसावंगी । प्रतिनिधी

शासनाने स्पष्ट आदेश देऊनही, घनसावंगी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे अनुदान बँक खात्यांवर होल्ड लावून रोखल्या जात होते. याविरोधात समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजपा नेते सतीश घाटगे यांनी थेट बँकेत जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि बँक खात्यावरील होल्ड काढायला भाग पाडले.

राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना जाहीर झालेली अतिवृष्टीच्या भरपाईची रक्कम दिवाळीपूर्वी खात्यात जमा करण्यात येत आहे. या अनुदानावर कोणत्याही प्रकारचा होल्ड किंवा निर्बंध न लावण्याचे आदेश यापूर्वीच सरकारने दिले आहेत. या अनुदानाचा उद्देश शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना त्वरित आर्थिक मदत करणे हा आहे. मात्र, घनसावंगी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे खाते महाराष्ट्र बँकेच्या शाखेने होल्ड लावून रोखले आहे. याची तक्रार सतीश घाटगे यांच्याकडे शेतकऱ्यांनी केली होती. शेतकऱ्यांच्या या गंभीर तक्रारींची दखल घेत, सतीश घाटगे यांनी थेट महाराष्ट्र बँकेच्या शाखेला भेट दिली. बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मनमानी कारभाराचा जाब विचारला. तसेच होल्ड काढायला सुरुवात न केल्यास मुख्यमंत्र्याकडे तक्रार करण्याचा इशारा दिला. त्यानंतर लगेच सर्व खाती अनहोल्ड करण्याचा शब्द अधिकाऱ्यानी दिला.

०००

हे पैसे शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सरकारने दिले आहेत आणि त्यावर होल्ड लावणे म्हणजे थेट सरकारच्या आदेशाचा भंग करणे आहे. शेतकरी आधीच संकटात आहेत आणि त्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वापरण्यापासून रोखणे हे कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही,

–सतिष घाटगे, चेअरमन समृद्धी साखर कारखाना.

# पीकविमा न भरलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजूर झालेला ठराव शासनाकडे पाठविणार – आ. पाटील

धाराशिव । प्रतिनिधी

अतिवृष्टी आणि महापुरामुळे जिल्ह्यात झालेले नुकसान अभुतपूर्व आहे. त्यामुळे पीकविमा भरलेला नसलेल्यांपैकी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनाही दिलासा मिळायला हवा, असा ठराव जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ठराव मंजूर झाला आहे. तो आता राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

धाराशिव जिल्ह्यातील आठ तालुक्यातील एकूण ७३३ गावांमध्ये अतिवृष्टी आणि महापुरामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

यात धाराशिव तालुक्यातील सर्वाधिक १२५ गावांचे त्यापाठोपाठ तुळजापूर तालुक्यातील १२२, भूम, परंडा आणि उमरगा तालुक्यातील ९६, लोहारा तालुक्यातील ४७, कळंब तालुक्यात ९७ तर वाशी तालुक्यातील बाधित गावांची संख्या ५४ इतकी आहे. जिल्ह्यातील एकूण सहा लाख ३९ हजार ९२७ शेतकरी बांधवांच्या वाट्याला या




अतिवृष्टी आणि महापुरामुळे नुकसान आले आहे. जिल्ह्यात पाच लाख ३४ हजार ३८२ हेक्टरहून अधिक क्षेत्र बाधित झाले आहे. यात पाच लाख ५४३२ हेक्टर जिराईत, २२ हजार ६११ हेक्टर बागायत तर सहा हजार ६३९ हेक्टर क्षेत्र फळपिकांचे आहे. बाधित असलेल्या संपूर्ण क्षेत्राचे शंभर टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील आठही तालुक्यातील एकूण नुकसानीची तीव्रता अभूतपूर्व अशीच आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील एकूण एक हजार ६८३ विहिरी खचल्या असल्याचे आ. पाटील यांनी म्हटले आहे.

# पुढील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार!

परळी । प्रतिनिधी

ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अडचणी यांची सविस्तर चर्चा केली. मागील भेटीच्या वेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ट्रस्टकडून करण्यात आली होती.

या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना येत्या एक ते दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच अतिवृष्टीमुळे खरवडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे करून संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे काम येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी जलनायक मयंक गांधी प्रयत्नशील आहेत.

# पारध पोलिसांनी पकडले गोवंश मांस

## १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

भोकरदन । प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध पोलिसांनी धावडा ते वालसावंगी रोडवरील भुयारेश्वर फाट्याजवळ रिक्षातून गोमांस घेऊन जाणाऱ्या सिल्लोड तालुक्यातील शिवणा येथील तीन जणांना पकडून त्यांच्या ताब्यातून गोमांस व लोडिंग रिक्षा असा १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.




याबाबत पारध पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी सुनील सुखदेव जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, धावडा ते वालसावंगी जाणाऱ्या रोडवरील भुयारेश्वर फाटाजवळ संशयित ईरफान शब्बीर कुरेशी, मसुद ऊर्फ लाला मुसा कुरेशी व रईस रशीद कुरेशी (सर्व रा. कुरेशी मोहल्ला शिवाणा, ता. सिल्लोड) यास ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी पारध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सहायक फौजदार जायभाय हे करीत आहेत. पारध पोलिसांच्या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या या कारवाईचे नागरिकांतून कौतुक करणत येत आहे. कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत.

# बीड पंचायत समिती कार्यालयाकडून महिलांच्या स्वच्छतागृहाला कुलूप

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समिती कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या महिला अभ्यागतांसह कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसाठी असलेले स्वच्छतागृह 'पाणी नाही' या कारणावरून बंद ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने या समस्येवर उपाययोजना करण्याऐवजी ''बाहेरील शौचालय वापरा'' अशी लाजिरवाणी सूचना प्रवेशद्वारावर लावून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला आहे. गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लावण्यात आलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, ''पाणीपुरवठा सुरळीत नसल्यामुळे स्वच्छतागृहात दुर्गंधी येत असल्याने कार्यालयात आलेल्या अभ्यागतांनी बाहेरील स्वच्छतागृह वापरावे.''




ग्रामीण भागातून कार्यालयात येणाऱ्या महिलांसाठी बाहेर शौचालय शोधणे हे अत्यंत गैरसोयीचे असून सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. तसेच कार्यालयात कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना यामुळे मोठी अडचण भासत आहे. महिलांच्या आरोग्याच्या आणि गोपनीयतेच्या दृष्टीने स्वच्छतागृह ही मूलभूत गरज असून शासकीय कार्यालयांनी ती सुविधा कायम ठेवणे बंधनकारक आहे. पाणीपुरवठा नसल्यानं सुविधा बंद ठेवणे ही प्रशासनाची अनास्था असल्याचे स्पष्ट दिसते. पाणीपुरवठा सुरळीत करणे, स्वच्छता राखणे आणि दुर्गंधी दूर करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना, नागरिकांना गैरसोयीच्या स्थितीत ठेवणे अमान्य आहे. एकीकडे शासन स्वच्छ भारत मिशनच्या घोषणा करते, कोट्यवधी रुपयांचा निधी वापरते; तर दुसरीकडे महिलांसाठी असलेले शासकीय स्वच्छतागृह बंद ठेवले जात आहे ही बाब स्वच्छ भारत योजनेला हरताळ फासणारी आहे. या पार्श्वभूमीवर, सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दि. २० ऑक्टोबर, सोमवार रोजी पंचायत समिती कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा देत प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. तसेच, या प्रकरणी लाडक्या बहिणींची हेळसांड करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजित पवार यांना लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे.

# सप्टेंबर महिन्यात संभाजीनगर जिल्ह्यातील ६ लाख हेक्टरचे नुकसान



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे अंतिम अहवाल तयार झाले आहेत. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ६ लाख ७ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीबद्दल शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी ५६१ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.यंदा जून महिन्यापासून सातत्याने मराठवाडाभर अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले. सप्टेंबर महिन्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. जवळपास सर्वच महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. हाताशी आलेल्या खरीप पिकांचे नुकसान झाले. त्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून, आता अंतिम अहवाल तयार करण्यात आला आहे. संभाजीनगर जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात तब्बल ६ लाख ८५ हजार शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. तर जिल्ह्यात एकूण ६ लाख ७ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी ५६१ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. यात कोरडवाडूसाठी हेक्टरी साडेआठ हजार, बागायतीसाठी हेक्टरी १७ हजार आणि फळपिकांसाठी हेक्टरी २२ हजार पाचशे रुपये इतकी मदत अपेक्षित आहे.

# कारवाया गुलदस्त्यात, अन्नसुरक्षा अधिकारी वसुली मात्र जोमात

## बोगसगिरी थांबविण्यासाठी व्यापारी महासंघ घेणार जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**बीड | प्रतिनिधी**

येथील अन्न सुरक्षा अधिकारी अनुराधा भोसले यांचा मनमानी कारभार सुरु आहे. तपासणीच्या नावाखाली व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक वसुली सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, अन्नसुरक्षा अधिकारी अनुराधा भोसले यांनी शासनाची गाडी न वापरता स्वतःच्या गाडीतून फिरत, तपासणीच्या नावाखाली व्यापाऱ्यांकडून पैशांची उकळपट्टी सुरु केल्याचे आरोप होत आहेत.

व्यापारी महासंघाचे राज्य सचिव संतोष सोहणी, राज्य उपाध्यक्ष विनोद पिंगळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहीती दिली आहे. त्यांनी सांगितले की, ''बीड, केज, धारुर आणि शिरूर या ठिकाणी अन्नभेसळ विभागातील काही अधिकारी व्यापाऱ्यांकडून परवाने व नूतनीकरणाच्या नावाखाली वसूली करत आहेत. या संदर्भात अनेक व्यापार्यांनी थेट व्यापारी महासंघाकडे तक्रारी केल्या आहेत. त्यानंतर व्यापारी महासंघ आक्रमक झाला आहे.

### अधिकाराचा गैरवापर, कारवाईची मागणी करणार –सोहनी, पिंगळे





''अन्नभेसळ विभागाचा उद्देश ग्राहक संरक्षणाचा असताना, काही अधिकारी त्याचा गैरवापर करत आहेत. व्यापारात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यावसायिकांना त्रास दिला जात आहे. आम्ही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी आणि दोषींवर कारवाईची मागणी करणार आहोत. अशी माहिती व्यापारी महासंघाचे राज्य सचिव संतोष सोहनी, राज्य उपाध्यक्ष विनोद पिंगळे यांनी दिली.

### मानसी मॉलमधूनही वसुलीचा आरोप

बीड शहरातील मानसी मॉलचे मालक श्रीकांत घोडके यांनी व्यापारी महासंघाच्या कार्यालयात येऊन आपल्याकडून अन्नसुरक्षा अधिकारी अनुराधा भोसले यांनी तपासणीच्या नावाखाली वीस हजार रुपये घेतल्याची तक्रार केली आहे. त्यांनी सांगितले की, ''तपासणीच्या नावाखाली माझ्या मॉलमध्ये येऊन त्यांनी सरळ पैसे मागितले आणि देण्यास नकार दिल्यास परवाना रद्द करण्याची धमकी दिली.'' या प्रकरणाची प्राथमिक माहिती व्यापारी महासंघाने जिल्हाधिकारी यांना देत तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. महासंघाचे पदाधिकारी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन लेखी तक्रार सादर करणार आहेत.

### राज्यस्तरीय तपासणी मोहिमेत बीड ठरले वसुलीचे केंद्र?

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित खाद्यपदार्थ मिळावेत म्हणून राज्यभर अन्नभेसळ विभागाने तपासणी मोहीम हाती घेतली आहे. मात्र बीड जिल्ह्यात या मोहिमेचा गैरफायदा घेत काही अधिकारी वसुलीचे केंद्र उभे करत असल्याचा व्यापाऱ्यांचा आरोप आहे.

### भोसले यांचा फोन बंद

दरम्यान या संदर्भात अनुराधा भोसले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांचा मोबाईल फोन बंद असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. त्यामुळे आरोपांबाबत त्यांची बाजू अद्याप स्पष्ट झालेली नाही.

# बाजारात सोयाबीनला कवडीमोल भाव, व्यापारी शेतकऱ्यांना लुटू लागले

## शासकीय हमीभाव खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा –उल्हास गिराम



**बीड | प्रतिनिधी**

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. हाताशी आलेले पीक जमीनदोस्त होताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. ह्या अस्मानी संकटातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत असतानाच बाजारात सोयाबीनची कवडीमोल भावात खरेदी करून शेतकऱ्यांना संकटात ढकलण्याचे पाप होत आहे. शेतकऱ्यांची लूट थांबविण्याकरता तात्काळ शासकीय खरेदी केंद्र सुरू करावीत, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.

दिवाळीचा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला असताना शेतकऱ्यांनी अतिवृष्टीत वाचवलेले सोयाबीन काढून बाजारात आणले आहे. सोयाबीन काढण्यासाठीही मोठा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. सोयाबीन मजुरीचे दर ६०० ते ७०० रुपये झाले आहेत. मजूर मिळत नसल्याने हेक्टरी गुत्ते पद्धतीने काढण्यासाठी दयावे लागत आहे, त्यात दीडपटीने खर्च जास्त येत आहे. आपली आर्थिक गरज भागवण्यासाठी ◀◀ पान २ वर

# आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रयत्नाने धारूरमध्ये कुंडलिकाचे आले पाणी

**किल्ले धारूर | चंद्रकांत देशपांडे**

माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळुंके यांच्या महत प्रयत्नाने धारूर मध्ये अखेर पुंडलिकाचे पाणी आले. कुंडलिकाचे पाणी आल्यामुळे संपूर्ण शहरात प्रचंड आनंदाचे वातावरण पसरले असून सर्वत्र आमदार सोळुंके यांचे अभिनंदन होत आहे.



वास्तविक धारूर शहर पाण्यासाठी शेकडो वर्षापासून तडपत आहे. अनेक अध्यक्ष आले आणि गेले मात्र एकालाही कायमची पाणी पाणी योजना धारूरला आणता आलेली नाही. खरे पाहिले तर दहा वर्षांपूर्वीच आमदार प्रकाश दादांनी हेच पाणी धारूरला आणण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र तत्कालीन नगराध्यक्ष यांच्या अडेल तट्टू धोरणामुळे धारूर मध्ये पाणी येण्यास अडथळे निर्माण झाले. शुल्लक कारणासाठी हेतू पुरस्कार अडथळे निर्माण करण्याचे काम काही पुढाऱ्यांनी केले. अखेर धारूरच्या जनतेच्या रेट्यामुळे व शहरातील पाण्याची गरज लक्षात घेऊन आमदार प्रकाश दादांनी युद्ध पातळीवर प्रयत्न केले व पाणी धारूरला आणण्यात यश मिळाले हा इतिहास आहे.

सध्या पाणी धारूरच्या एसटी स्टँड पर्यंत आले आहे आता संपूर्ण शहरात ते पोहोचवण्यासाठी देखील आमदारांनाच प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण शहरातील पुढारी निवडणुकीच्या राजकारणामुळे निवडणूक होईपर्यंत ते होऊ देणार नाहीत. व नंतर मात्र जो अध्यक्ष येईल तो श्रेय घेण्याचे प्रयत्न करेल यासाठी आमदार साहेबांनी प्रशासनाला हाताखाली घेऊन निवडणूक सुरू असताना देखील धारूरच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सोडवावा अशी जनतेची इच्छा आहे. ◀◀ पान २ वर

# दसरा मेळाव्यातून सोन्याची साखळी लंपास करणारा चोरटा एलसीबीने केला जेरबंद

**पाटोदा | प्रतिनिधी**

सावरगाव घाट या ठिकाणी मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या दसरा मेळाव्यामध्ये एकाच्या गळ्यातील सोन्याची साखळी अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. याप्रकरणी अंमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने यासंदर्भात गतीने तपास करून यातील आरोपीला जेरबंद केले आहे.



पाटोदा तालुक्यातील रोहतवाडी येथील लहू काशिनाथ नागरगोजे हे दसरा मेळावा निमित्त सावरगाव या ठिकाणी आले होते. परंतु या ठिकाणी आल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास केली. यानंतर नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून अंमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंद झाला करण्यात आला होता. ◀◀ पान २ वर

# क्षीरसागर मुक्त नगरपालिका करणार –नवनाथ शिराळे

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये सध्या नगरपालिकेचे राजकारण तापत असून याच पार्श्वभूमीवर गेल्या ३५ वर्षांमध्ये क्षीरसागर यांनी बीड शहराचा कुठला विकास न करता सर्व भकास केलेला आहे कारण बीड शहराला पाणीदेखील देण्यामध्ये क्षीरसागर कमी पडले आहेत पंधरा ते वीस दिवसाला बीड शहरवासी यांना पाणी मिळते ते देखील अशुद्ध पाणी काही ठिकाणी पाण्यामध्ये कुत्रे मेलेले आढळतात यामुळे माणसाचे आरोग देखील धोक्यात आलेले आहे



याच अनुषंगाने बीड शहरातील बीड परिसरातील सर्व नागरिक नाराज असल्यामुळे त्यांना आता ही नगरपालिका निवडणूक लढवण्याचा कुठलाच नैतिकतेचा अधिकार क्षीरसागर यांना नसल्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेत माजी सभापती नवनाथ आण्णा ◀◀ पान २ वर

# पुढील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार!

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे जलनायक मयंक गांधी यांना आश्वासन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अडचणी यांची सविस्तर चर्चा केली. मागील भेटीच्या वेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ट्रस्टकडून करण्यात आली होती. या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना येत्या एक ते दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार असल्याचे आश्वासन दिले.



तसेच अतिवृष्टीमुळे खरवडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे करून संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे काम येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी जलनायक मयंक गांधी प्रयत्नशील आहेत.

# पाटोदा महावितरणच्या कामकाजावर पाटोदेकर नाराज!

**पाटोदा | प्रतिनिधी**

दिवाळीच्या आनंदी वातावरणातच पाटोदा शहर व परिसरात दिवाळीच्या पहिल्याच दिवशी वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू राहिल्याने व्यापारी वर्ग, सामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. बाजारपेठेतील दिवाळीच्या खरेदीला शिखर असताना अचानक वीज गायब झाली. त्यामुळे दुकानदारांना अंधारात दिवे, सजावट आणि व्यवहार करणे कठीण झाले. काही भागात वारंवार वीज ये-जा होत राहिल्याने इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान झाल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून पुढे येत आहेत.महावितरणचे अधिकारी मात्र देखभाल आणि तांत्रिक अडचणींचे कारण सांगत आहेत. परंतु दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात सततचा वीजलपंडाव सहन न करता नागरिक सोशल मीडियावरून संताप व्यक्त करत आहेत.दिवाळी घरात अंधार, दुकानात अंधार मग महावितरणचं कामकाज कुठं? असा प्रश्न पाटोदेकरांनी उपस्थित केला आहे. नागरिकांनी तातडीने नियमित आणि स्थिर वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे.

# कपिलधारवाडीत सर्पदंशामुळे गायीचा मृत्यू गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते.

शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे या



गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.

गावकऱ्यांचे म्हणणे ◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यास नुकसान भरपाईची मागणी

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

# आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड

**बीड | प्रतिनिधी**

आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती



देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले यावेळी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# प्रा. नरेशकुमार जैस्वाल यांना पीएचडी प्राप्त

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित फार्मसी कॉलेज अंबाजोगाई येथील प्रा. नरेशकुमार जैस्वाल यांना मध्यप्रदेश विद्यापीठाकडून नुकतीच पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी, मध्य प्रदेश. मधून फार्मासुटिकल सायन्स या विषयात पीएचडी मिळवली आहे.



''एनहांसमेंट ऑफ सोलुबीलीटी फोर प्युअरली सोल्यूबल ड्रग्स'' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. या विषयात जैस्वाल यांनी सखोल अभ्यास करून व त्यावर अनेक बाबींवर संशोधन करून आपला प्रबंध मध्यप्रदेश विद्यापीठास दाखल केला होता. दाखल केलेल्या प्रबंधाचा विचार व अभ्यास करून मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्यप्रदेशच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांना नुकतीच त्या विष्यायावर पीएचडी प्रदान केली आहे. या पीएचडी साठी त्यांना डॉ. अमित कुमार अग्रवाल यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी हे यश संपादित केले आहे. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. वसंत चव्हाण, डॉ. डी.एच. थोरात , टी. बी. गिरवलकर कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चे प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी, प्रा बिराजदार , प्रा राजमाने सर, प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, मित्र परिवाराच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# सरसगट मदतीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक चुकीचे पंचनामे आणि तुटपुंज्या मदतीवर बोळवण

**बीड–परळी / प्रतिनिधी**

सरसगट मदतीच्या नावावर शेतकऱ्यांच्या तोंडाची पाने पुसण्याचे काम सरकारकडून करण्यात आले असून जिल्ह्यात लाखो हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना बागायती मदतीपासून वंचीत ठेवण्याच्या संतापजनक प्रकार जिल्ह्यात घडला असून खरडून गेलेल्या जमिनी व विहिरीचे वास्तवीक पंचनामे करण्यात यावे, भावांतर योजना तर दूरच पण किमान शासकीय हमीभावाने सोयाबीन, कापूस खरेदी केंद्र सुरू करावे यासह इतर मागण्याकरिता बलिप्रतिपदा दिनी किसान सभा शेतकऱ्यांना घेऊन आंदोलन करणार असल्याची माहिती किसान सभेने दिली आहे.

सप्टेंबर मधील अतिवृष्टी आणि महापूर यामुळे जिल्ह्यातील शेती क्षेत्राचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे.जिरायती, बागायती शेती क्षेत्र आणि त्यावरील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या विदारक परिस्थितीत प्रशासनाने जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या कमांड एरिया अर्थात सिंचन क्षेत्र असलेली २ लाख हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना जिल्हा प्रशासनाने केवळ १८ हजार एवढेच क्षेत्र बागायती दाखवल्याने बागायती क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना देखील जिरायती क्षेत्राप्रमाणे तुटपुंज्या मदतीवर बोळवण करण्याचे काम प्रशासन आणि सरकारने केले आहे. बुजलेल्या, खचलेल्या विहिरीसाठी देखील अल्प मदत करत वाहून व खरवडून गेलेल्या शेतीची कामे देखील रोजगार हमी योजनेतून करणार असे सांगण्यात आले मात्र अद्याप ही यावर कोणतेही कार्यवाही सुरू करण्यात आलेली नाही.

जिल्ह्यात काही अंशी शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस या सारखे कमी उतारा आलेले पीक देखील बाजारात कवडीमोल विकावे लागत असल्याने शासनाने तात्काळ हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करावी. घोषीत केलेल्या कोट्यवधी रकमेपैकी दिवाळी गोड करण्याच्या नावाखाली केवळ ४५ रु गुंठा एवढी सरकारी मदत शेतकऱ्यांच्या खात्यात मिळत असल्याने सरकारी मदत म्हणजे जखमेवर ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आमच्या शिवन्याला न्याय द्या!; ३ महिन्यांच्या बहिणीच्या हातून तहसीलदारांना निवेदन



शिरूर – पिंपरखेड (ता. शिरूर) येथे घडलेल्या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शिवन्या बोंबे या साडेपाच वर्षांचा निरागस चिमुकलीवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आणि वाढत्या बिबट्यांच्या दहशतीच्या विरोधात शिरूर, आंबेगाव, जुन्नर तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील संतप्त ग्रामस्थांनी बेल्हा-जेजुरी मी महामार्गावरील पंचतळे (जांबूत) चौकात रास्ता रोको करत चक्काजाम आंदोलन छेडले.

यावेळी अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला. मात्र नागरिकांनी ठीय्या सोडला नाही. आमच्या शिवन्याला न्याय द्या, बिबट्यांपासून आमचे रक्षण करा! या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. भर पावसातही ग्रामस्थांनी आंदोलन सुरू ठेवत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.या आंदोलनात शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी मंत्री सदाभाऊ खोत माजी आमदार पोपटराव गावडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे, माजी सदस्य सुरेश भोर, पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ. सुभाष पोकळे, अरुणा घोडे, दामुशेठ घोडे शेतकरी संघटनेचे नेते शिवाजीराव नांदखीले, माऊली ढोमे तसेच परिसरातील सर्वच गावांचे सरपंच, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थाह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

दरम्यान, वनविभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरीक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, उपनिरीक्षक दिलीप पवार, शुभम चव्हाण, राहुल भागवत व कर्मचारी यांनी घटनास्थळी उपस्थित राहून आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. संतप्त नागरिकांनी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, बिबट्यांना पकडून सुरक्षित ठिकाणी हलवावे, आमचा संपूर्ण विभाग बिबटमुक्त करावा, अशी मागणी केली.यावेळी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी घटनास्थळी हजर होत आंदोलकांशी चर्चा करून जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सर्व मागण्या शासनापर्यंत पोहचविणार असल्याचे सांगितले. तदनंतर मृत शिवन्या बोंबेची तीन महिन्यांची चिमुरडी बहीण शरयु बोंबे, आई दिव्या बोबें व नागरिकांच्या हस्ते तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.ग्रामस्थांच्या या निर्धारपूर्ण आंदोलनामुळे प्रशासन आणि वनविभागावर आता ठोस कारवाई करण्याचा दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे येत्या काळात प्रशासन काय भुमिका घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## साक्षरता मोहीम आणि अपघातग्रस्तांना मदत
# शालेय शिक्षणमंत्री दादा भुसेंच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय



पुणे – देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने नवभारत साक्षरता कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेची राज्यात २०२२ ते २०२७ या कालावधीत अंमलबजावणी करण्यात येत असून, पायाभूत साक्षरता विकसित करण्यासाठी शालेय शिक्षण विभागासह सर्व विभागांच्या सर्वसमावेशक प्रयत्नांची गरज असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या राज्यातील अंमलबजावणीचा मंत्री भुसे यांनी आढावा घेतला. प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, योजना शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी या वेळी उपस्थित होते.विविध कारणांमुळे काही व्यक्ती शिक्षणापासून दूर राहिले आहेत. त्यांना किमान लिहिता वाचता यावे, यासाठी शासन प्रयत्नशील असून, राज्यात केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह सेवाभावी व्यक्तींनी योगदान द्यावे, असे आवाहन भुसे यांनी केले.अपघात झालेल्या विद्यार्थ्यांना अथवा त्यांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक लाभ मिळा,वा या उद्देशाने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येते. यायोजनेअंतर्गत प्रकरणे प्रलंबित असल्यास ती तातडीने मार्गी लावावीत, असे निर्देशही भुसे यांनी दिले.राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजना, तसेच मराठी भाषा फाऊंडेशन योजनेचाही भुसे यांनी आढावा घेतला. कृष्णकुमार पाटील यांनी विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती दिली.

## वढू बुद्रुकमध्ये उपसरपंच महिलेची दादागिरी, वृद्धेला घरात घुसून केली मारहाण

शिक्रापूर । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथे उपसरपंच महिलेने एका वृद्ध महिलेला शिवीगाळ करत घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. रस्त्यावर दुचाकीसाठी डबर टाकण्याच्या वादातून हा प्रकार घडला असून, शिक्रापूर पोलिसात उपसरपंचावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वढू बुद्रुक येथील प्रज्ञा रणदिवे (वय ६०) या त्यांच्या घरासमोर असलेल्या रस्त्यावर दुचाकी जाण्यासाठी डबर टाकून उंचवटा करत होत्या.

त्याचवेळी उपसरपंच संगीता शांताराम सावंत तेथे आल्या आणि त्यांनी प्रज्ञा यांना येथे डबर टाकू नका, असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. प्रज्ञा रणदिवे घरात गेल्यानंतर उपसरपंच संगीता सावंत यांनी त्यांच्या घरात अनाधिकाराने प्रवेश करत पुन्हा शिवीगाळ व दमदाटी करत मारहाण केली.घडलेल्या प्रकाराबाबत प्रज्ञा प्रदीप रणदिवे यांनी शिक्रापूर पोलिसात फिर्याद दिल्याने पोलिसांनी उपसरपंच संगीता शांताराम सावंत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विकास सरोदे हे करत आहेत.

# पराभवाने खचणार नाही, चाकणचा चेहरामोहरा बदलणारच -माजी आमदार दिलीप मोहितेंचा निर्धार

आळंदी । प्रतिनिधी

राज्यात सध्या महायुतीचे सरकार आहे. मात्र, आपण वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून योग्य रणनीती आखूया. पक्षाची संघटनशक्ती मजबूत आहे, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या प्रभागात जनसंपर्क वाढवावा आणि निवडणुकीसाठी सज्ज राहावे असे आवाहन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केले.आगामी आळंदी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या तयारीला वेग दिला आहे. फ्रूटवाले धर्मशाळा येथे झालेल्या आढावा बैठकीत खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी उपस्थित पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केले.



यावेळी तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर, निर्मलाताई पानसरे, अरुण चांभारे, डी. डी. भोसले पाटील, विलास कुर्हाडे, नंदकुमार कुर्हाडे, प्रकाश कुर्हाडे, प्रदीप बवले, सचिन घुंडरे, श्रीधर कुर्हाडे, पुष्पाताई कुर्हाडे, रुपाली पानसरे, सौरभ गव्हाणे, निसार सय्यद, संदेश तापकीर, आनंद रनदिवे तसेच आळंदी शहरातील असंख्य इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.यानंतर पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी पक्ष कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, इच्छुकांनी आपल्या प्रभागांमध्ये नियमित भेटीगाठी सुरू कराव्यात, दिवाळीच्या शुभेच्छा देत मतदारांशी संवाद साधावा.

स्थानिक पातळीवर महायुतीसोबत सन्मानाची वागणूक मिळाल्यास चर्चेतून निर्णय घेऊ; अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे स्वतःच्या बळावर नगरपरिषद जिंकण्याची ताकद आहे. बैठकीत सुकाणू समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यात पक्षाचा निरीक्षकही सहभागी असणार आहे. ही समिती इच्छुक उमेदवारांची पडताळणी करून योग्य उमेदवारांची निवड करणार आहे. या बैठकीमुळे आळंदीत राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषद निवडणुकीच्या तयारीला आता खर्या अर्थाने सुरूवात झाल्याचे चित्र दिसून आले.

## वाघाळे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अनिता विजय गावडे यांची बिनविरोध निवड

रांजणगाव गणपती । प्रतिनिधी

वाघाळे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अनिता विजय गावडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मावळत्या सरपंच नंदा संभाजी शेळके यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.सरपंच पदासाठी अनिता गावडे यांचा एकमेव अर्ज आल्याने अनिता विजय गावडे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेसाठी मंडलाधिकारी स्वाती टावरे, कामगार तलाठी मनोहर तेलंग, व ग्रामसेवक शितल भालसिंग यांनी सहकार्य केले.



याप्रसंगी शिरूर खरेदी विक्री संघाचे संचालक लहू थोरात, संचालिका सुजाता नरवडे, ज्योती मानसिंग पाचुंदकर, सोसायटीचे चेअरमन नरसिंग घोलप, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भोसले, राजेंद्र धायबर, विकास कारकूड, नलिनी थोरात, अनिता शेळके, नंदा शेळके, शेतकरी संघटनेचे नेते सुहास काटे, उद्योजक वैभव गावडे, खंडाळेच्या सरपंच सारिका दरवडे, माजी सरपंच ज्योती नरवडे, रांजणगाव ग्रामपंचायत सदस्य मनीषा पाचुंदकर उपस्थित होत्या.नवनिर्वाचित सरपंच अनिता गावडे यांचा ज्योती मानसिंग पाचुंदकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# घायवळ टोळीला आणखी एक दणका, शूटरसह गांजा विक्रेता गजाआड



पुणे – किरकोळ कारणावरून तरुणावर गोळीबारप्रकरणी कुख्यात गुंड नीलेश घायवळ याच्या गँगमधील शूटरसह गांजा विक्रेत्या तस्कराला खंडणीविरोधी पथक दोनने नर्हेतून अटक केली आहे. १७ सप्टेंबरला टोळक्याने तरुणावर गोळीबार केला होता. त्यानंतर संबंधित आरोपी पसार झाला होता. अखेर त्याला अटक करण्यात पथकाला यश मिळाले आहे. मुसाब शेख (३४, रा. नर्हे) आणि तेजस डांगी (वय ३३) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

रस्त्यावर गप्पा मारत थांबलेल्या तरुणाने दुचाकीला जाण्यास रस्ता दिला नाही, यावरून झालेल्या वादावादीतून नीलेश घायवळ टोळीतील सराईताने आणि साथीदारांनी एकावर गोळीबार केला. त्यामुळे संबंधित तरुण गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर काही अंतरावर टोळीने एकावर वार केल्याची घटना १७ सप्टेंबरला कोथरूडमध्ये घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी मयूर कुंबरे, रोहित आखाडे, गणेश राऊत, मयंक उर्फ मॉन्टी व्यास, आनंद चांदलेकर उर्फ अंड्या, दिनेश फाटक यांना अटक करीत त्यांची धिंडही काढली होती.

त्यातील आरोपी मुसाब शेख पसार झाला होता. तो नर्हेत असल्याची माहिती पोलीस अंमलदार अमोल घावटे यांना मिळाली.खंडणी विरोधी पथक दोनने नर्हेत धाव घेत आरोपी मुसाब शेख याला ताब्यात घेतले. त्याच्यासोबत तेजस डांगी या गांजा तस्करालाही बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून ९०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त निखील पिंगळे, एसीपी राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, उपनिरीक्षक गौरव देव, सुरेंद्र जगदाळे, पवन भोसले, प्रशांत शिंदे, अमोल राऊत, दिलीप गोरे, अनिल कुसाळकर, गणेश खरात यांनी केली.कुख्यात गुंड नीलेश घायवळ टोळीविरुद्ध पोलिसांनी गुन्ह्यांची मालिका सुरू केली आहे. त्याच्याविरुद्ध थेट मोक्का कारवाई करीत आतापर्यंत ६ गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे दादागिरीसह दहशत माजवणार्या सराईतांसह टोळ्या अंडरग्राउंड झाल्या आहेत. मागील काही दिवसांपासून गंभीर गुन्ह्यांचे प्रमाणही घटल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सराईतांविरुद्ध होणार्या कारवाईचा वेग कायम ठेवावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# पुणे सहकारी बँकेवरील निर्बंध हटले ; रिझर्व्ह बँकेचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

पुणे सहकारी बँकेवर लावलेले सर्वसमावेशक निर्बंध रिझर्व्ह बँकेने गुरुवारी (ता. १६) पूर्णपणे उठवले. त्यामुळे बँकेचे सर्व व्यवहार आता नियमितपणे सुरु होत असल्याची माहिती प्रशासक मंडळाच्या अध्यक्षा आणि सहकारी विभागाच्या सहाय्यक निबंधक प्रगती वाबळे यांनी दिली.

बँकेच्या प्रशासक मंडळात पांडुरंग राऊत, ॲड. विकास रासकर, भालचंद्र कुलकर्णी, राहुल पारखे व नेहा केदारी यांचा समावेश आहे. गतवर्षी बँकेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली होती. रिझर्व्ह बँकेसमवेत नुकत्याच झालेल्या टास्क फोर्स बैठकीत सहकार आयुक्त दीपक तावरे यांनीही या बँकेचे नियमित व्यवहार सुरू व्हावेत, यासाठी विशेष प्रयत्न केले होते.




मार्च २०२३ मध्ये पुणे सहकारी बँकेवर निर्बंध लावण्यात आले होते. त्यामुळे ठेवी स्वीकारण्यावर आणि कर्ज व्यवहार करण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली होती. आता सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहाराला पुन्हा सुरुवात होत असल्याने बँकेची आर्थिक स्थिती सक्षम होईल, असा विश्वास प्रशासक मंडळाच्यावतीने व्यक्त करण्यात आला आहे.पुणे सहकारी बँकेची स्थापना शहराचे माजी खासदार स्व. ल. सो. तथा अण्णा जोशी यांच्या नेतृत्वाखाली २००३ मध्ये झाली होती. सध्या बँकेच्या पुण्यात हडपसर व बाणेर अशा दोन शाखा असून, बँकेकडे नऊ कोटी ५० लाख रुपयांच्या ठेवी आहेत. तर कर्जे रु. पाच कोटी ५० लाखांची आहेत. प्रशासक मंडळातील सर्व सदस्य हे साखर उद्योग, बँकिंग, सहकार, शेती यामधील अनुभवी असून त्यांच्या प्रयत्नातून नवीन सभासदांकडून सुमारे दोन कोटींचे भाग भांडवल जमा झाले आहे, त्याचबरोबर थकबाकी वसूली देखील चांगली होत असल्याने बँकेचे नक्त मूल्य (नेट वर्थ) अधिक झाले आहे. तर इतरही निकषांमध्ये बँकेने चांगली प्रगती केली आहे, अशी माहिती प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नारायण वाईकर यांनी दिली.

## यंदाचा पुणे पुस्तक महोत्सव १३ ते २१ डिसेंबरला होणार

**पुणे । प्रतिनिधी**

वाचनप्रेमींसाठी ज्ञानाची पर्वणी ठरणारा आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा 'पुणे पुस्तक महोत्सव २०२५' यंदा अधिक भव्य आणि वैविध्यपूर्ण स्वरूपात असणार आहे. महोत्सवाचे हे तिसरे पर्व येत्या १३ ते २१ डिसेंबर दरम्यान फर्ग्युसन महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर आयोजित करण्यात आले असून, यामध्ये तब्बल ८०० पुस्तकांची दालने, सहा दिवसीय साहित्य महोत्सव आणि विविध आकर्षक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे, अशी घोषणा राष्ट्रीय पुस्तक न्यासचे (एनबीटी) संचालक युवराज मलिक आणि महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत केली.

गेल्या वर्षीच्या अभूतपूर्व यशानंतर यंदाचा महोत्सव अधिक मोठा असणार आहे. मागील वर्षीच्या ७०० दालनांच्या तुलनेत यंदा विविध भारतीय भाषांमधील पुस्तकांची ८०० दालने वाचकांच्या भेटीला येणार आहेत. १५ लाखांहून अधिक पुस्तकप्रेमी या महोत्सवाला भेट देतील आणि कोट्यवधी रुपयांची उलाढाल होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

महोत्सवात लहान मुलांसाठी खास 'चिल्ड्रेन कॉर्नर' उभारण्यात येणार असून, यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, विविध कार्यशाळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जाईल. तसेच, 'जॉय ऑफ रीडिंग' या संकल्पनेवर आधारित छायाचित्र स्पर्धा आणि लेखकांसाठी 'ऑथर कॉर्नर' हे देखील महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. यासोबतच, पुस्तक खरेदीचा आनंद घेणाऱ्या खवय्यांसाठी ३० हून अधिक खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले जाणार आहेत.

## तुमच्या वाचाळवीरांना आवरा!; सुप्रिया सुळेंचा थेट मुख्यमंत्र्यांना सल्ला, भाजपच्या बदललेल्या भाषेवर

पुणे – 'ना खावूंगा, ना खाने दुंगा', पारदर्शक कारभार करून भाजपा भ्रष्टाचारमुक्त भारत करणार होते. मात्र, आज भारतात सर्वाधिक भ्रष्टाचार वाढला असून, त्यामध्ये पुणे हे सगळ्यात भ्रष्टाचारी शहर नोंदविले असून, हा अहवाल माझा नसून भारत सरकारने दिलेला अहवाल सांगतो, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगत याची जबाबदारी भाजपला घ्यावी लागेल, असेही सांगितले.भाजपा हा सुसंस्कृत पक्ष होता. त्याची भाषा, विरोधकांचा मानसन्मान लोकशाही पद्धतीने केला जात होता.

मात्र, गेल्या काही वर्षांत भाजपमध्ये आलेली नवी भाषा मला अस्वस्थ करते. त्यामुळे कटुता वाढवू नका, तुमच्या वाचाळवीरांना महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि ऐक्यासाठी वेळीच आवरा, असा सल्लाही सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिला. ज्या जिल्ह्यात मुख्यमंत्री आठवड्यातून दोनदा येतात, त्या जिल्ह्यात गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. पोलिसांवर हल्ले होणे दुर्दैवी आहे.दरम्यान, राज्यात आत्महत्या वाढतात, हे सरकारचे अपयश आहे.



निवडणुकीत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करू, असे अश्वासन दिले होते. मात्र, आता पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणार, असे अश्वासन दिले, मात्र अजूनतरी पैसे आलेले मी एकले नाही, त्यामुळे गोड कसली ही काळी दिवाळी आहे, असे बोलावे लागते हेच दुर्दैवी आहे. मतदार यादीतील घोळाबाबत महाविकास आघाडीने घेतलेल्या पत्रकार परिषदेवरून भाजपने केलेल्या टीकेवर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, मतदार यादीत घोळ आहे का तर आहेच.हा फक्त आरोप नाही तर डेटा सांगतो. मात्र, त्यांना वास्तवतेत जगायचेच नसेल तर त्यावर आम्ही काय बोलणार. मतदार यादी पारदर्शकपणे झालीच पाहिजे. मतदार यादीच जर जागेवर नसेल तर सरकार इलेक्शन कशी घेणार. कॉपी करून पास होणे आणि कष्ट करून पास होणे यात अंतर असल्याचे सांगत सुळे यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले.

## गाड्यांची तोडफोड प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल; येरवडा पोलिसांनी काढली धिंड

पुणे । प्रतिनिधी

येरवडा पोलीस स्टेशन हद्दीतील लक्ष्मी नगर परिसरात दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी गाड्यांची तोडफोड करणाऱ्या आरोपींविरोधात येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ७०६/२०२५ नुसार भा.न्या.सं. (BNS) कलम ११८, १८९(२), १९१(२) तसेच हत्यार कायदा कलम ३, ७ आणि क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

गुन्ह्यात अटक करण्यात आलेले आरोपी

मुस्ताफा बशीर बेपारी ( १९ ) सैफ अली अझिमुद्दीन शेख (२१ )तसेच याच गुन्ह्याशी संबंधित गुन्हा क्रमांक १८३/२०२५, कलम ११७(२), ११५(२) इत्यादी बीएनएस ३(१)(ळळ), ३(२), ३(४) मोक्का कायद्यानुसार आरोपी करण खंडेराव कुंभार (२३ ) यालाही तपासासाठी ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीसांनी घटनास्थळाला भेट देऊन सखोल तपास सुरू केला असून गुन्ह्यातील इतर पाहिजे आरोपींचा शोध सुरू आहे. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेळके (येरवडा पोलीस स्टेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.